Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

MONDAY, 22ND FEBRUARY 1897.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम बंदिरे मुंबई, तारीख २ माहे डिसेंबर सन १८९६.

नंबर ९६९७.—हिंदुस्थान सरकारचा खालील जाहिरनामा पुनः प्रसिद्ध केला असेः—

"होम डिपार्टमेंट.

पब्लिक.

मुक्काम कलकत्ता, तारीख २६ माहे नव्हेंबर सन १८९६.

नंबर १८२९.— हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) ह्याच्या ५ व्या व ७ व्या कलमांअन्वयें दिलेले अधिकार चालवून ज्या कांहीं विवक्षित कानू करण्याचें योजिलें आहे त्यांचा खालील मसुदा, सदरील आक्टाच्या १८ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें आणि हिंदुस्थान सरकारचा होम डिपार्टमेंटांतला जाहिरनामा नंबर १९६४, तारीख २ माहे सप्टेंबर सन १८८७, ह्यांत सांगितल्याप्रमाणें, त्या कानूंशीं ज्या लोकांचा संबंध असण्याचा संभव असेल त्या लोकांच्या माहितीसाठीं, प्रसिद्ध केला आहे; आणि ह्याअन्वयें असें फर्माविण्यांत येत आहे कीं, त्या मसुद्याचा विचार गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांकडून, तारीख १९ माहे फेब्रुआरी सन १८९७ नंतर करण्यांत येईल.

२. सदहू मसुद्यासंबंधाची जी कोणतीही सूचना किंवा हरकत कोणत्याही मनुष्याकडून, सदहू तारिखेच्या पूर्वी येईल, तिचा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांकडून विचार करण्यांत येईलः—

### बारी पदार्थ एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्याच्या कामाचें व आयात करण्याच्या कामाचें नियमन करण्यासाठींच्या कानूंचा मसुदा.

हिंदुस्थान सरकारचा होम डिपार्टमेंटांतील जाहिरनामा नंबर १४१७ (पब्लिक), तारीख २४ माहे जून सन १८८७, हा रद्द करून आणि हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) ह्याच्या ५ व्या आणि ७ व्या कलमांअन्वयें दिलेले अधिकार चालवून, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांनीं, बारी पदार्थ एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्याच्या व आयात करण्याच्या कामाचें नियमन करण्यासाठीं खालील कानू केल्या आहेतः—

ह्या कानू सर्व ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहेत, परंतु, बारी पदार्थ एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्याच्या संबंधाच्या कानू, हिंदुस्थानचा बंदरांबाबद आक्ट (सन १८८९ चा १० वा) यांत व्याख्या केलेल्या प्रकारच्या ज्या कोणत्याही बंदरासाठीं स्थानिक सरकारानें केलेल्या व त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या विशेष कानूवरून ज्या मानानें

स्पष्टपणें रद्द केलेल्या असतील अगर ज्या मानानें त्यांस विरुद्ध असतील, त्या मानानें त्या, त्या बंदरास लागू होणार नाहींत.

कोणताही बारी पदार्थ जर,—

(अ) सरकारच्या हुकुमावरून, अथवा,

(ब). हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४चा ४ था) ह्याच्या अमलबजावणीसाठीं, अगर म्यागझीनचा रखवालदार ह्मणून, शिल्पकार ह्मणून, लष्करी शिपाई ह्मणून, खलाशी ह्मणून, पोलीसमन ह्मणून अगर इतर रीतीनें सरकारच्या नोकरीस ठेविलेल्या कोणत्याही मनुष्यानें अगर इंडियन व्हालंटियर आक्ट (सन १८६९ चा २० वा) अन्वयें व्हालंटियर ह्मणून पटांत दाखल केलेल्या कोणत्याही मनुष्यानें, त्या त्या नात्यानें आपल्या नोकरीच्या कामीं अगर वास्तविक कामाच्या संबंधानें,

तयार केला, कबजांत ठेविला, वापरला, विकला, एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेला, किंवा आयात केला तर, त्या बाबतींत ह्या कानूंतील कोणताही ठराव लागू होणार नाहीं.

## प्रथमारंभींचे ठराव.

१. ह्या कानूंच्या कारणांसाठीं बारी पदार्थांचे खालीं लिहिल्याप्रमाणें वर्ग केले आहेत असें समजावें, ह्मणजेः—

वर्ग १ —बंदुकीची दारू.
,, २ —नैट्रेट-मिक्श्चर.
,, ३ —नैट्रो-कांपौंड.
,, ४ —क्लोरेट-मिक्श्चर.
,, ५ —फल्मिनेट.
,, ६ —युद्धसामग्री.
,, ७ —दारूकाम.

आणि जेव्हां एखादा बारी पदार्थास एका वर्गाहून अधिक वर्गांचें वर्णन लागू असेल, तेव्हां त्यास ज्या वर्गांचें वर्णन लागू असेल त्यांतील वरील अनुक्रमाप्रमाणें फक्त शेवटल्याच वर्गाचा तो आहे असें समजलें पाहिजे.

### वर्ग १.—बंदुकीच्या दारूचा वर्ग.

"बंदुकीची दारू" या संज्ञेचा अर्थ, जीस बंदुकीची दारू असें साधारणतः ह्मणतात तीच मात्र बंदुकीची दारू असा आहे.

### वर्ग २.—नैट्रेट्-मिक्श्चरचा वर्ग.

"नैट्रेट-मिक्श्चर" या संज्ञेचा अर्थ, जिला बंदुकीची दारू असें साधारणतः ह्मणतात ती बंदुकीची दारू शिवाय करून, ज्यांत बारी गुण नाहींत अशा कोणत्याही रूपाच्या कारबनाशीं किंवा कारबनच्या कोणत्याही पदार्थांशीं कोणत्यातरी नैट्रेटचें नुस्तें मिश्रण करून बनविलेला कोणताही दुसरा पदार्थ असा आहे; अशा तयार केलेल्या पदार्थांत मग गंधक घातलेला असो किंवा नसो, आणि असा तयार केलेला पदार्थ, बारी नसणाऱ्या दुसऱ्या कोणत्याही पदार्थाबरोबर नुस्ता मिश्र केलेला असो किंवा नसो.

नैट्रेट-मिक्श्चरच्या वर्गांत—

पैरोलाइथ,

प्युड्रोलाइथ,

पुडर साक्सिफ्रॉजाईन,

यांसारखे बारी पदार्थ आणि वरील व्याख्या ज्यास लागू आहे असा तयार केलेला कोणताही पदार्थ, यांचा समावेश होतो.

### वर्ग ३.—नैट्रो-कांपौंडचा वर्ग.

"नैट्रो-कांपौंड" या संज्ञेचा अर्थ, नैट्रिक आसिडाची (तें नैट्रिक आसिड मग सल्फ्यूरिक आसिडाशीं मिश्र झालेलें असो किंवा नसो) किंवा सल्फ्यूरिक आसिडाशीं मिश्र झालेल्या नैट्रेटाची, कोणत्याहि कारबनच्या पदार्थावर

रसायनक्रिया घडून जो उत्पन्न झाला असून ज्यांत बार होण्याचे गुण असतील किंवा जो धातूंशीं संयोग पावून एकादा बारी संयुक्तपदार्थ उत्पन्न करण्यास शक्त असेल असा कोणताही रसायनाक्रियेनें उत्पन्न झालेला संयुक्तपदार्थ; अशा संयुक्तपदार्थांचें मग दुसऱ्या पदार्थांबरोबर नुसतें मिश्रण झालेलें असो किंवा नसो.

नैट्रो-कांपौंडच्या वर्गाचे दोन भाग आहेत :—

भाग १ यांत—

नैट्रो-ग्लिसरीन,

डायुनमैट,

लिथोफ्रयाक्‌च्यूर,

डुअलाईन,

ग्लायआक्सिलाइन,

मिथिलिक नैट्रेट,

यांसारखे बारी पदार्थ, आणि ज्यांत सर्वांशीं किंवा अंशतः नैट्रो-ग्लिसरीन किंवा दुसरा एकादा प्रवाही नैट्रो-कांपौंड आहे असा कोणताही रसायनक्रियेनें उत्पन्न झालेला संयुक्तपदार्थ किंवा असा कोणताही नुसतें मिश्रण करून तयार केलेला पदार्थ, यांचा समावेश होतो.

भाग २ यांत—

गन-काटन असें ज्यास साधारणपणें नांव आहे तो,

गन-पेपर,

क्सायलोइडाइन,

गन सॉडस्ट,

नैट्रेटेड गनकाटन,

काटन गनपौंडर,

शुल्टझची पौडर,

नैट्रो मान्नैट,

पिक्रिट्स,

पिक्रिक पौडर,

टोनाइट (अगर काटन पौडर),

यांसारखे बारी पदार्थ, व पूर्वीं व्याख्या केलेल्या प्रकारचा असून पहिल्या भागांत आलेला नाहीं असा कोणताही नैट्रो-कांपौंड, यांचा समावेश होतो.

### वर्ग ४.—क्लोरेट मिक्श्चरचा वर्ग.

"क्लोरेट-मिक्श्चर" या संज्ञेचा अर्थ, ज्यांत एकादें क्लोरेट आहे असा कोणताही बारी पदार्थ असा आहे. क्लोरेट मिक्श्चरच्या वर्गाचे दोन भाग आहेत;—

भाग १ यांत—

हार्सलेची सुरुंगाची दारू,

ब्रेनची सुरुंगाची दारू,

यांसारखे बारी पदार्थ, आणि ज्यांत अंशतः नैट्रो-ग्लिसरीन किंवा दुसरा एकादा प्रवाही नैट्रो-कांपौंड आहे असा कोणताही क्लोरेटचा तयार केलेला पदार्थ, यांचा समावेश होतो.

भाग २ यांत—

हार्सलेची मूळची सुरुंगाची दारू,

एरहार्डट्‌ची पौडर,

रेव्हर्लेची पौडर,

हाव्स्व्याड्टरचे सुरुंगाचे चार्ज,

रिचेनचे सुरुंगाचे चार्ज,

टयूटोनैट,

क्लोरेटेड गनकाटन,

यांसारखे वारी पदार्थ, व पूर्वी व्याख्या केलेल्या प्रकारचें असून पहिल्या भागांत आलेलें नाहीं असें कोणतेंही क्लोरेट-मिक्श्चर, यांचा समावेश होतो.

## वर्ग ५.—फल्मिनेटचा वर्ग.

" फल्मिनेट" या शब्दाचा अर्थ, ज्यांत बार होण्याजोगा गुण फार असल्यामुळें जो *तोट्यांत किंवा बार काढण्याच्या दुसऱ्या कोणत्याही साधनांत उपयोग करण्याला योग्य आहे, किंवा जो बार होण्यास अत्यंत पात्र असल्यामुळें व फार अस्थिर असल्यामुळें ( ह्मणजे, ज्याचे घटकावयव फारच थोडक्या उद्दीपक कारणांवरून लागलेच निरनिराळे होण्यासारखे असल्यामुळें ) विशेषेंकरून भयंकर आहे, असा रसायनक्रियेनें उत्पन्न झालेला कोणताही संयुक्तपदार्थ किंवा नुस्तें मिश्रण होऊन झालेला कोणताही पदार्थ, असा आहे; अशा पदार्थाचा मग वर सांगितलेल्या वर्गांमध्यें समावेश होवो किंवा न होवो.

फल्मिनेटच्या वर्गाचे दोन भाग आहेतः—

**भाग १** यांत, रुप्याच्या व पाऱ्याच्या फल्मिनेटांसारखे संयुक्त पदार्थ, आणि तोट्या करण्यांत ज्यांचा उपयोग करण्यांत येतो तसे सदर्हू जिनसांपासून तयार केलेले पदार्थ, आणि कारबनच्या पदार्थांसहित किंवा कारबनच्या पदार्थांवांचून फास्फरसच्या बरोबर झालेलें, किंवा कांहीं विशेष प्रकारचे फास्फरसचे संयुक्तपदार्थ यांच्या बरोबर झालेलें कोणत्या तरी क्लोरेटाचें मिश्रण ज्यांत आहे असा तयार केलेला कोणताही पदार्थ, आणि कारबनच्या पदार्थांसहित किंवा कारबनच्या पदार्थांवांचून गंधकाशीं झालेलें, किंवा कोणत्या तरी सल्फ्युरेटाशीं झालेलें एखाद्या क्लोरेटाचें मिश्रण ज्यांत आहे असा तयार केलेला कोणताही पदार्थ, यांचा समावेश होतो.

**भाग २** यांत, नैट्रोजनचा क्लोरैड व ऐओडैड, फल्मिनेटिंग सोनें व रुपें, डायाझोबेनझोल, व डायाझोबेनझोलचा नैट्रेट, अशा पदार्थांचा समावेश होतो.

## वर्ग ६.—युद्धसामग्रीचा वर्ग.

" युद्धसामग्री " या शब्दाचा अर्थ, स्मॉल आर्म्स, तोफा किंवा दुसरें कोणतेंही शस्त्र यांकरितां किंवा सुरुंग लावण्याकरितां काडतूस किंवा भरण्याचा बार होईल, किंवा सुरुंग लावण्यासाठीं किंवा कुलपी गोळ्यांसाठीं कोणतीही सेफ्टी किंवा दुसऱ्या प्रकारची † फ्यूज होईल, किंवा वारी पदार्थ पेटविण्याकरितां कोणतीही नळी होईल, किंवा तोटी, डिटोनेटर, धुक्याची सिग्नल ( निशाणी ), कुलपी गोळा, टार्पिडो, लढाईचा बाण, किंवा दारूकामाशिवाय दुसरें युक्तीचें साधन होईल अशा रीतीनें वर सांगितलेल्या वर्गांतून कोणत्याही वर्गाचा कोणता तरी वारी पदार्थ जेव्हां कोणत्याहि कोशांत, किंवा दुसरे कांहीं युक्तीनें साधन तयार करून त्यांत घातलेला असेल, किंवा इतर प्रकारें योग्य असेल किंवा तयार केलेला असेल तेव्हां तो वारी पदार्थ, असा आहे.

" तोटी " या संज्ञेंत डिटोनेटरचा समावेश होत नाहीं.

' डिटोनेटर ' या संज्ञेचा अर्थ, ज्या डबीची किंवा कोशाची शक्ति व रचना अशी असते कीं व जींत किंवा ज्यांत फल्मिनेट वारी पदार्थांच्या वर्गांतील कोणता तरी वारी पदार्थ अशा प्रमाणानें भरलेला असतो कीं तशी एक डबी किंवा कोश बार होऊन उडाली किंवा उडाला असतां तेणेंकरून दुसऱ्या तशाच डब्या किंवा कोश बार होऊन उडतात अशी कोणतीहि डबी किंवा कोश.

* तांब्याचा फटाकडा.  † रंजूक नळी.

"सेफ्टी फूज" या संज्ञेचा अर्थ, सुरुंग लावण्याकरितां फूज असा आहे; ही फूज जळते परंतु हिचा बार होत नाहीं, व हींत पेटण्याचें स्वतः आंगचें साधन नाहीं, व हिची शक्ति व रचना अशी असते कीं व हींत कोणता तरी बारी पदार्थ अशा प्रमाणानें भरलेला असतो कीं, अशी फूज पेटल्यानें बाजूच्या तशाच दुसऱ्या फूजी पेट घेत नाहींत.

"सेफ्टी काडतुसें" या संज्ञेचा अर्थ, ज्या काडतुसांचा कोश, बार केल्यानंतर स्माल आर्म्‌समधून काढतां येतो व जीं अशा रीतीनें बंद केलेलीं असतात कीं एका काडतुसाचा कोणत्याही प्रकारें बार झाला तरी तेणेंकरून दुसऱ्या काडतुसांचा बार होत नाहीं, अशीं, स्माल आर्म्‌ससाठीं काडतुसें असा आहे. रैफल-क्यालिबर मशीन-गन काडतुसें सदरील प्रकारचीं असतीं तर त्यांचाही ह्या सदरांत समावेश होतो, मग हीं काडतुसें ज्या मशीन-गनच्या चेंबर रैफलांच्या चेंबरांसारख्याच असतात अशा मशीन-गनमध्यें उपयोग करण्यासाठीं असोत, किंवा ज्यांस स्पेशल चेंबर असतात अशा मशीन-गनमध्यें उपयोग करण्यासाठीं असोत.

स्माल-आर्म काडतूस जास्तींत जास्ती एका इंचाच्या मापाचें असेल तेव्हां मात्र त्याला "सेफ्टी" ह्मणून कबूल करण्यांत येईल. मशीन-गन काडतुसांचीं जीं मापें "सेफ्टी" ह्मणून कबूल करण्याचा अधिकार आहे तीं येणेंप्रमाणें:—

·३०३ इंच कॉर्डाइट.

मार्टिनि-हेन्री रैफल, सॉलिड केस.

·४५ इंच गार्डनर, गार्टिंग व नार्डेनफेल्ट गन, मार्टिनि-हेन्री चेंबर्ड गन शिवाय करून.

·४ इंच.

ह्याहून जास्त मापाचीं काडतुसें "सेफ्टी काडतुसें" नव्हत.

युद्धसामग्रीच्या वर्गाचे तीन भाग आहेत:

**भाग १ यांत—**

सेफ्टी काडतुसें,

सुरुंग लावण्याच्या सेफ्टी फूजी,

कुलपी गोळ्यांसाठीं फूजी आणि बंदुकांसाठीं फ्रिक्शन नळ्या; मात्र एकाच प्याकेजांत, ९ हून जास्त फूजी, किंवा २९ हून जास्त नळ्या नसाव्या, आणि तें प्याकेज ह्मणजे पक्का बंद असा धातूचा सिलिंडर असावा,

रेल्वेच्या धुक्याच्या सिग्नली (निशाण्या),

तोट्या,

ह्यांचाच मात्र समावेश होतो.

**भाग २** यांत, जी वर व्याख्या केलेल्या प्रकारची असून जिच्यामध्यें पेटण्याचें स्वतः आंगचें साधन नाहीं व जी १ ल्या भागांत आलेली नाहीं अशी कोणतीही युद्धसामग्री येते, उदाहरणार्थ—

सेफ्टी काडतुसें नाहींत अशीं स्माल आर्म्‌सचीं काडतुसें,

तोफा, कुलपी गोळे, खाणी, सुरुंग यांकरितां किंवा अशाच दुसऱ्या कारणाकरितां काडतुसें व भरण्याचे बार,

कोणताही बारी पदार्थ ज्यांत आहे असे कुलपी गोळे व टार्पिडो,

सेफ्टी फूजी नाहींत अशा सुरुंगाकरितां फूजी,

कुलपी गोळ्याकरितां फूजी,

बारी पदार्थ उडविण्याकरितां नळ्या,

लढाईचे बाण,

कीं ज्यांच्यामध्यें पेटण्याचें स्वतः आंगचें साधन नाहीं.

**भाग ३** यांत, जी वर व्याख्या केलेल्या प्रकारची असून जिच्यामध्यें पेटण्याचें स्वतः आंगचें साधन आहे व जी १ ल्या भागांत आलेली नाहीं अशी कोणतीही युद्धसामग्री येते, उदाहरणार्थ—

डिटोनेटर,

सेफ्टी काडतुसें नाहींत अशीं स्माल आर्म्सचीं काडतुसें,

सेफ्टी फुजी नाहींत अशा सुरुंगाकरितां फूजी,

कुलपी गोळ्यांकरितां फूजी,

बारी पदार्थ उडविण्याकरितां नळ्या,

कीं ज्यांच्यामध्यें पेटण्याचें स्वतः आंगचें साधन असतें.

पेटण्याचें स्वतः आंगचें साधन असणारी युद्धसामग्री या शब्दांचा अर्थ, जिच्यामध्यें अशी योजना केलेली असते कीं त्या योजनेच्या योगानें, घर्षण झालें असतां किंवा ठोका बसला असतां, जी वार होऊन उडते किंवा पेट घेते अशी युद्धसामग्री; सदहू योजना मग त्या युद्धसामग्रीस जोडलेली असो किंवा तिचा आंगचा भाग असो.

## वर्ग ७.—दारूकामाचा वर्ग.

दारूकामाच्या वर्गाचे दोन भाग आहेत.

**भाग १** यांत, यानंतर दिलेला विशेष ठराव लागू राहून, दारूकामाच्या दारूचा ह्मणजे ज्याचा तयार केलेलें दारूकाम बनविण्यासाठीं उपयोग करण्यांत येतो, व जो बारी पदार्थांच्या मागें सांगितलेल्या वर्गामध्यें येत नाहीं असा कोणताही वारी किंवा पेट घेणाऱ्या प्रकारचा, रसायनक्रियेनें उत्पन्न झालेला संयुक्तपदार्थ किंवा नुस्तें मिश्रण करून बनविलेला पदार्थ, याचा, आणि तशीच रंगारंगाचे अग्नीचो कोणतीहि दारू व चांदणी हिचा समावेश होतो असें समजावें.

**भाग २** यांत, तयार केलेल्या दारूकामाचा, ह्मणजे, ज्यापासून * स्क्विब, फटाकडा, खेळण्याचा बंदुकीचा केप ह्मणजे एमोर्स, साप, (लढाईच्या बाणाखेरीज इतर प्रकारचा) बाण, †मरून, ‡ल्यान्स, चक्र, चैनीझ फायर, रोमन क्यांडल, किंवा दारूकामाचे परिणाम अगर दारूकामाच्या सिगूनली अगर आवाजाच्या सिगूनली उत्पन्न करण्यास विशेष प्रकारें लायक असा दुसरा कोणताही पदार्थ तयार होईल अशा रीतीनें मागें सांगितलेल्या कोणत्याही वर्गांतील कोणताही वारी पदार्थ किंवा कोणतीही दारूकामाची दारू जेव्हां कोणत्याही कोशांत किंवा युक्तीनें कोणतेंही साधन तयार करून त्यांत घातलेला किंवा घातलेली असेल, किंवा इतर प्रकारें तयार केली किंवा केला असेल तेव्हां त्या वारी पदार्थाचा व त्या दारूकामाच्या दारूचा समावेश होतो असें समजावें.

*मात्र इतकेंच कीं,* आपोआप पेट घेण्यास पात्र नसणारी रंगाचे अग्नीची एक रत्तल वजनाहून जास्त नाहीं इतकी दारूकामाची दारू ज्या मजबूत आणि हवा आंत न जाई अशा रीतीनें बंद केलेल्या धातूच्या कोशांत भरलेली असेल, तो कोश 'तयार केलेलें दारू काम' होय असें समजलें पाहिजे.

## एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेणें.

### (अ).—प्याक करणें.

२. पुढील सामान्य कानू, बारी पदार्थ नेण्याच्या कारणासाठीं प्याक करण्याच्यासंबंधानें पाळिल्या पाहिजेत :—

१.—प्रत्येक वर्गाचा बारी पदार्थ निरनिराळा प्याक केला पाहिजे.

२.—एकादा बारी पदार्थ ९ व्या (फल्मिनेटच्या) वर्गांतील, अगर ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या २ ऱ्या व ३ ऱ्या भागांतील, अगर ७ व्या (दारूकामाच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील बारी पदार्थ नसून, त्याचें परिमाण ९ रत्तलांहून अधिक नसेल तर, तो बारी पदार्थ, जेणेंकरून तो बाहेर निघून येणार नाहीं अशा रीतीनें तयार केलेल्या व अशा रीतीनें बंद केलेल्या एकाद्या मजबूत पेटींत, पोत्यांत, डब्यांत, अगर इतर पात्रांत भरलेला असला पाहिजे.

३.—इतर प्रत्येक बाबतींत बारी पदार्थ दुहेरी प्याकेजांत भरलेला असला पाहिजे. त्यांपैकीं आंतील प्याकेज, जेणेंकरून तो बारी पदार्थ बाहेर निघून येणार नाहीं अशा रीतीनें तयार केलेली व बंद केलेली मजबूत पेटी, पोतें, डबा अगर इतर पात्र असलें पाहिजे, व बाहेरील प्याकेज लांकडाची अगर धातूची अगर इतर मजबूद पदार्थाची पेटी, पीप, अगर केस (पेटी) असून, ती पेटी, पीप अगर केस हिची बळकटी, रचना व तऱ्हा हीं अशीं असलीं पाहिजेत कीं, ती नेतांना फुटूं नये किंवा सहजगत्या उघडली जाऊं नये किंवा तिच्यांत कांहीं कमीपणा होऊं नये अगर तिजपासून धोका येऊं नये, व तींतून तो बारी पदार्थ बाहेर निघून येऊं नये :

* एका प्रकारचें दारूचें कंवठ. † चंद्रजोत. ‡ एका प्रकारचा बाण.

मात्र इतकेंच कीं :--

(अ) सदर्हू बारी पदार्थ १ ल्या ( अगर बंदुकीच्या दारूच्या ) वर्गांतील अगर २ ऱ्या ( नैट्रेट मिक्श्चरच्या ) वर्गांतील बारी पदार्थ असेल, अगर ३ ऱ्या ( नैट्रो-कांपौंडच्या ) वर्गाच्या २ ऱ्या भागांतील गन काटन अगर दुसरा एकादा बारी पदार्थ असेल, तर पहिल्या दोन वर्गांच्या बारी पदार्थांच्या बाबतींत, बाहेरील कोणत्याही एका प्याकेजांतील बारी पदार्थाचें परिमाण १०० रतलांहून अधिक नसावें, व इतर बारी पदार्थांच्या बाबतींत ९० रतलांहून अधिक नसावें.

तो बारी पदार्थ पिक्रिक आसिड असेल तर, आंतलें प्याकेज अशा प्रकारचें असलें पाहिजे कीं, त्याच्या योगानें, त्या आसिडाचा कोणत्याही बेसिक मेट्यालिक आक्साइडला स्पर्श न होण्याबद्दल पक्के रीतीनें बंदोबस्त व्हावा. *

(ब) सदर्हू बारी पदार्थ ३ ऱ्या ( नैट्रो-कांपौंडच्या ) वर्गाच्या १ ल्या भागांतील अगर ४ थ्या ( क्लोरेट-मिक्श्चरच्या ) वर्गांतील असेल तर, आंतील प्याकेज बनवितांना त्यांत कोणत्याही धातूचा उपयोग केलेला असतां कामा नये व आंतील अगर बाहेरील प्याकेज अगर दोन्हीही प्याकेजें, त्यांतून पाणी मुळींच आंत शिरणार नाहीं अशीं † असलीं पाहिजेत. आंतील प्याकेजांपैकीं प्रत्येकांत १० रतलांहून अधिक जिन्नस असूं नये, व बाहेरील कोणत्याहि एका प्याकेजांत बारी पदार्थाचें परिमाण एकंदरींत ९० रतलांहून अधिक नसावें.

(क)--१. सदर्हू बारी पदार्थ ५ ऱ्या ( फल्मिनेटच्या ) वर्गांतील असून तो जर अशा प्रकारचा असेल कीं तो पाण्याशीं मिसळून प्याक करितां येत नाहीं, किंवा तो तशा तऱ्हेनें प्याक केला असतां धोका उत्पन्न होण्यासारखा आहे, तर, तो, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे विशेष प्रकारें फर्मावितील त्या रीतीनें प्याक केला पाहिजे.

२. फल्मिनेटच्या वर्गापैकीं इतर कोणताही बारी पदार्थ पुढें लिहिल्याप्रमाणें प्याक केला पाहिजे :— तो, क्यालिको, कितान किंवा पाणी ज्यांतून शिरेल अशा इतर कापडाच्या पोत्यांत किंवा बारदानांत, दरेक पोत्यांत किंवा बारदानांत २५ रतलांहून जास्त फल्मिनेट नाहीं अशा प्रमाणानें भरून, प्याक केला पाहिजे; आणि हीं पोतीं किंवा बारदानें, त्यांतून तो बारी पदार्थ मुळींच बाहेर निघून येऊं नये अशा रीतीनें तयार केलेलीं व बंद केलेलीं असलीं पाहिजेत. हीं पोतीं किंवा बारदानें, ज्या पेटींत तो बारी पदार्थ एकसारखा भिजला राहण्याइतकें पाणी असेल त्या पेटींत प्याक केला पाहिजे, आणि अशी पेटी ( जिला ह्यापुढें आंतली पेटी असें ह्मटलें आहे ), ज्या पेटींत सदर्हू आंतल्या पेटीच्या भोंवतीं नेहमीं राहण्याइतकें पाणी असेल अशा एका बाहेरच्या पेटींत प्याक केली पाहिजे; आणि सदर्हू आंतील पेटीची व बाहेरील पेटीची बळकटी, रचना व तऱ्हा हीं अशीं पाहिजेत कीं, ती नेतांना फुटूं नये, किंवा सहजगत्या उघडली जाऊं नये किंवा तिच्यांत कांहीं कमीपणा होऊं नये अगर तिजपासून धोका येऊं नये व तींतून फल्मिनेट किंवा पाणी बाहेर निघून येऊं नये. आणि कोणत्याही एका बाहेरील पेटींत सदर्हू बारी पदार्थाचें परिमाण, बारी पदार्थाच्या एकाद्या इन्स्पेक्टराच्या संमतीशिवाय, व त्यानें पसंत केलेल्या अटींवरहुकुम तजवीज केलेली असल्याशिवाय, २०० रतलांहून अधिक नसावें.

---

* टीप—जस्त अगर शिसें इत्यादि विवक्षित धातूंनीं आंतून मढविलेल्या केसींत पिक्रिक आसिड प्याक केलें असतां एकादें पिक्रेट उत्पन्न होऊन धोका उत्पन्न होण्याची भीति असते ह्मणून तशा रीतीनें तें आसिड प्याक करण्यांत येऊं नये हा या कानूचा उद्देश आहे. पिक्रिक आसिड एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं न्यावयाचें असल्यास किंवा सांठवून ठेवावयाचें असल्यास तें, पाणी न शिरणाऱ्या अशा पोत्यांत भरून तीं पोतीं बंदुकीच्या दारूच्या पिपांत घालून ठेवणें हा एक सोपा व सुरक्षित मार्ग आहे ह्मणून तो सुचविला आहे.

† टीप—ज्यांत पाणी मुळींच जाणार नाहीं असें प्याकेज असलें पाहिजे हा ठराव खालील पदार्थांस लागू नाहीं :—

(१) ४ थ्या ( क्लोरेट मिक्श्चरच्या ) वर्गाच्या २ ऱ्या भागांत येणारे सर्व बारी पदार्थ.

(२) ३ ऱ्या ( नैट्रो कांपौंडच्या ) १ ल्या भागांतील ज्या बारी पदार्थांतलें नैट्रो-ग्लिसरीन त्या पदार्थाचा पाण्यास स्पर्श झाला असतां निघून बाहेर येत नाहीं असे बारी पदार्थ—उदाहरणार्थ सुरुंगाचें जिलेटैन, जिलेटैन डायनमैट, कॉर्डाइट व ब्यालिस्टाइट व जेल्मिग्नाइट; मात्र इतकेंच कीं, सदरीं नांवें दिलेल्या पदार्थांशिवाय दुसऱ्या कोणत्याही पदार्थाच्या बाबतींत, तो सदर्हू प्रकारचा असल्याबद्दल बारी पदार्थाच्या एकाद्या चीफ इन्स्पेक्टरनें दाखला दिलेला पाहिजे.

३. एक फल्मिनेट प्याक करण्यास प्रत्यक्ष रीतीनें वापरलेलें कोणतेंही प्याकेज दुसरें कोणतेंही फल्मिनेट प्याक करण्यास किंवा इतर कोणत्याही कामीं वापरूं नये.

४. बाहेरच्या पेटीवर, "बारी पदार्थ" हे शब्द आणि त्या बारी पदार्थाचें नांव व त्यानंतर "फल्मिनेट, भाग १" ( अगर प्रसंगाप्रमाणें भाग २ ) हे शब्द आणि मालकाचें अगर पाठविणाराचें नांव, हा तपशील ढळढळीत अक्षरांनीं डागला पाहिजे, अगर पक्के रीतीनें बसविलेल्या लेबलानें अगर इतर निशाणीनें दर्शविला पाहिजे.

(ड)—१. कोणताही बारी पदार्थ ६ व्या ( युद्धसामग्रीच्या ) वर्गाच्या १ ल्या भागांतील असेल, तर, तो लांकडाच्या, धातूच्या किंवा इतर भरींव पदार्थाच्या पेटींत, पिपांत, अगर केसींत भरलेला असावा, आणि त्या पेटीचो पिपाचो अगर केसीची बळकटी, रचना व तऱ्हा हीं अशीं असलीं पाहिजेत कीं, ती नेतांना फुटूं नये किंवा सहजगत्या उघडली जाऊं नये किंवा तिच्यांत कांहीं कमीपणा होऊं नये अगर तिजपासून कांहीं धोका येऊं नये, व तींतून तो बारी पदार्थ बाहेर निघून येऊं नये.

२. सदर्हू बारीपदार्थ ६व्या ( युद्धसामग्रीच्या ) २ऱ्या भागांतील असेल तर, त्यास खालील कानू लागू राहातील: त्या येणेंप्रमाणें:—

(१) ज्या कोणत्याही कुलपी गोळ्यांत किंवा टार्पेडोंत कोणताही बारी पदार्थ भरलेला असेल, तो गोळा किंवा टार्पेडो निराळा असो अगर एकाद्या बाणाचा किंवा इतर साधनाचा अंगभूत असो, तो, त्या बारी पदार्थाच्या संबंधानें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे विशेष हुकुम करून जी रीत फर्मावितील त्या रीतीनें प्याक केला पाहिजे.

(२) कोणत्याही बारी पदार्थाचें, तोफांकरितां, कुलपी गोळ्यांकरितां, खाणींकरितां, सुरूंगाकरितां अगर त्यासारख्या इतर कारणांकरितां तयार केलेलें कोणतें काडतूस अगर चार्ज प्याक करणें असल्यास, त्या पदार्थाचें तसें काडतूस अगर चार्ज केलेला नसतांना तो पदार्थ ज्या रीतीनें प्याक करणें जरूर आहे त्या रीतीनें प्याक केला पाहिजे.

मात्र इतकेंच कीं, दुहेरी प्याकेज जरूर असेल त्या बाबतींत, काडतुसाचा अगर चार्जाचा कोश, आंतील प्याकेज्यासंबंधाच्या शर्तींबरहुकुम असल्यास, तोच आंतील प्याकेज होय असें समजण्यास हरकत नाहीं.

(३) २ ऱ्या भागांतील इतर कोणताही बारी पदार्थ, लांकडाच्या, धातूच्या किंवा इतर मजबूत पदार्थाच्या पेटींत, पिपांत अगर केसींत प्याक केला पाहिजे; ती पेटी, पीप अगर केस हिची बळकटी, रचना व तऱ्हा हीं अशीं असलीं पाहिजेत कीं, ती नेतांना फुटूं नये, किंवा सहजगत्या उघडली जाऊं नये किंवा तिच्यांत कांहीं कमीपणा होऊं नये अगर तिजपासून कांहीं धोका येऊं नये व तींतून बारी पदार्थ बाहेर निघून येऊं नये: आणि अशा कोणत्याही एका प्याकेजांत १९० रतलांहून जास्त युद्धसामग्री असूं नये.

(ई) सदर्हू बारी पदार्थ ६ व्या ( युद्धसामग्रीच्या ) वर्गाच्या ३ ऱ्या भागांतील असेल तर तो दुहेरी प्याकेजांत प्याक केला पाहिजे. आंतील प्याकेजांत असा बारी पदार्थ २ रतलांहून जास्ती असूं नये व बाहेरील प्याकेजांत ९० रतलांहून जास्ती असूं नये.

(फ) सदर्हू बारी पदार्थ ७ व्या ( दारूकामाच्या ) वर्गाच्या १ ल्या भागांतील असेल तर तो दुहेरी प्याकेजांत भरलेला असला पाहिजे. आंतील प्याकेज, हवा आंत न जाई अशा प्रकारें बंद केलेला एकादा मजबूत डबा, केस अगर इतर पात्र असून, त्यांत १ रतलाहून अधिक बारी पदार्थ असूं नये, व बाहेरील प्याकेजांत २० रतलांहून अधिक असूं नये; आणि

(ग) सदर्हू बारी पदार्थ ७ व्या ( दारूकामाच्या ) वर्गाच्या २ ऱ्या भागांतील असेल तर तो, लांकडाच्या, धातूच्या अगर इतर मजबूत पदार्थाच्या पेटींत, पिपांत अगर केसमध्यें, भरलेला असला पाहिजे, व ती पेटी, पीप अगर केस हिची बळकटी, रचना व तऱ्हा हीं अशीं असलीं पाहिजेत कीं, ती नेतांना फुटूं नये किंवा सहजगत्या उघडली जाऊं नये किंवा तिच्यांत कांहीं कमीपणा होऊं नये अगर तिजपासून धोका येऊं नये, व तींतून तो बारी पदार्थ बाहेर निघून येऊं नये; व कोणत्याही एका प्याकेजांतील बारी पदार्थाचें परिमाण १०० रतलांहून अधिक असूं नये.

४.—बारी पदार्थ कितीही असला, व तो कोणत्याही वर्गांतील अगर वर्गाच्या भागांतील असला, तथापि पुढें सांगितलेल्या शर्ती पाळिल्या पाहिजेत.—

(अ) प्रत्येक प्याकेजाच्या आंतील बाजूला, तें प्याकेज मग एकेरी असो अगर दुहेरी असो, रेती वगैरे राहूं देऊं नये व ती बाजू इतर प्रकारें स्वच्छ ठेविली पाहिजे;

(ब) ज्या ज्या प्याकेजाचा, तें मग एकेरी असो अगर दुहेरी असो, बारी पदार्थ प्याक करण्यासाठीं वास्तविक उपयोग केला असेल तशा प्रत्येक प्याकेजाचा, बारी पदार्थांच्या एकाद्या इन्स्पेक्टराच्या संमतीशिवाय आणि त्यानें पसंत केलेल्या शर्ती पाळिल्याशिवाय, त्याच किंवा इतर कोणत्याही वर्गांतील इतर कोणताहि बारी पदार्थ प्याक करण्यासाठीं किंवा इतर कोणत्याहि कामासाठीं उपयोग करितां कामा नये;

(क) सदहू प्रकारचें कोणतेंही एकेरी प्याकेज अगर आंतील किंवा बाहेरील प्याकेज तयार करण्याच्या कामीं कोणतेंही लोखंड किंवा पोलाद, तें कथलानें, जस्तानें अगर दुसऱ्या एकाद्या योग्य पदार्थानें सबंध मढविलें असल्याशिवाय, वापरतां नये.

(ड) अगदीं बाहेरच्या प्याकेजावर "बारी पदार्थ" हे शब्द व त्यांपुढें त्या बारी पदार्थाचें नांव अगर आंतील पदार्थाचें इतर वर्णन, व मालकांचीं अगर पाठविणाराचें नांव व पत्ता हीं डाग देऊन किंवा मजबूत लेबल लावून किंवा लिहून, ढळढळीत अक्षरांनीं लाविलीं पाहिजेत.

(इ) कोणत्याही एकेरी प्याकेजांतील, अगर दुहेरी प्याकेज असल्यास कोणत्याही एका बाहेरील प्याकेजांतील बारी पदार्थाचें परिमाण, बारी पदार्थांच्या एकाद्या इन्स्पेक्टराच्या अगर स्थानिक सरकारानें ह्या बाबतींत नेमलेल्या इतर अधिकाऱ्याच्या संमतीशिवाय व त्यानें पसंत केलेल्या शर्तींअन्वयें असल्याखेरीज, वर सांगितलेल्या कानूंत दर्शविल्यापेक्षां ज्यास्त असूं नये.

३. नेण्याच्या कारणासाठीं बारी पदार्थ प्याक करण्याच्या संबंधानें सदरीं सांगितलेल्या कानूंपैकीं कोणतीही एकादी कानू जो कोणताही मनुष्य मोडील तो १००० रु० पर्यंत दंडाच्या शिक्षेस पात्र होईल. *

(ब). - नेण्याची रीति.

४. पुढील सामान्य कानू बारी पदार्थ नेण्याच्या संबंधानें पाळिल्या पाहिजेतः—

१.—सदरीं सांगितलेल्या कानूंत ठरविलेल्या रीतीनें प्याक केलेला नसेल तर कोणताही बारी पदार्थ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेऊं नये.

२.—एकादा बारी पदार्थ नेण्यासाठीं जिचा उपयोग होत आहे अशा प्रकारच्या कोणत्याही गाडींतून किंवा तारवांतून, ज्यांत पेटण्याचें आंगचें साधन आहे असा सदहू प्रकारच्या बारी पदार्थाहून भिन्न वर्गांतील व भागांतील कोणत्याच प्रकारचा कोणताही बारी पदार्थ, अशा प्रकारच्या एका बारी पदार्थास आग लागली असतां किंवा तो पदार्थ बार होऊन उडाला असतां तेणेंकरून सदहू दुसऱ्या बारी पदार्थास आग लागूं नये किंवा तो बार होऊन उडूं नये ह्मणून तो सदहू पहिल्या बारी पदार्थापासून जरूर असेल तितका दूर ठेवलेला असल्याशिवाय, नेऊं नये.

३.—रेलवेनें न्यावयाचीं लहान कन्सैन्मेंटें, जीं कोणत्याही वेळीं उतरण्याचा अधिकार आहे, तीं खेरीज करून बारी पदार्थ, फक्त दिवस उगवल्याच्या व दिवस मावळण्याच्या दरमियान भरलीं किंवा उतरलीं पाहिजेत. ह्या कानूच्या कारणांसाठीं, अर्ध्या वागनीहून ज्यास्त कन्सैन्मेंट कोणत्याही एकाच स्टेशनास पाठविल्यास तें लहान कन्सैन्मेंट आहे असें समजूं नये.

४.—कोणत्याही गाडीवर अगर तारवावर बारी पदार्थ भरतेवेळीं अगर त्यांतून तो उतरतेवेळीं कोणत्याही प्रकारचा विस्तव अगर कृतीनें केलेला दिवा, अगर ज्यापासून आग किंवा बार उत्पन्न होईल किंवा पसरेल असा कोणताही जिन्नस [ जसें, कोळसा, ल्युसिफर, आगकाड्या, विस्तव पाडण्याचें सामान, पिट्रोलियम आक्ट ( सन १८८६ चा १२ वा ) अगर पिट्रोलियम आयात करणें, कबजांत ठेवणें व एका स्थलाहून दुसऱ्या स्थलीं नेणें ह्याबाबदचा त्या त्या वेळीं अमलांत असणारा इतर कोणताही आक्ट ज्यास लागू आहे असें पिट्रोलियम, अगर फ्यारेनहैटच्या १००° अंशांहून कमी उष्णतामानावर

* नियमांविरूद्ध असणाऱ्या बारी पदार्थाबद्दल झाडा घेणें व ते अटकावून ठेवणें ह्याबद्दलच्या कानू स्थानिक सरकारानें केल्या आहेत.

पेट घेणारी वाफ ज्यापासून निघते असें कोणतेंही स्पिरिट, तेल अगर पदार्थ ] अशा गाडीच्या, जहाजाच्या अगर बोटीच्या, धोका उत्पन्न होईल इतक्या जवळ, आणतां कामा नये, अगर आणूं देतां कामा नये, किंवा बाळगतां कामा नये, अगर बाळगूं देतां कामा नये, किंवा वापरतां कामा नये, अगर वापरूं देतां कामा नये; व तींत, तीवर, अगर धोका होईल इतक्या तिच्या जवळ तंबाखू ओढूं देतां कामा नये;

मात्र इतकेंच कीं, सदरहू प्रकारचा माल भरण्याच्या अगर उतरण्याच्या कारणासाठीं दिव्याचा उपयोग केल्याखेरीज चालतच नाहीं असें असेल तेव्हां, ज्या फाणसाची रचना, ठेवण्याची जागा किंवा तऱ्हा हीं अशीं असतील कीं तेणेंकरून आग अगर बार उत्पन्न होण्याची कोणत्याही प्रकारें भीती नसेल असा फाणस वापरण्यास हरकत नाहीं; आणि ( बंदुकीची दारू, ६ व्या वर्गाच्या १ ल्या भागांतील बारी पदार्थ, अगर ७ व्या वर्गांतील बारी पदार्थ हीं प्याक करण्याबाबदच्या कानूंअन्वयें प्याक केलीं असतील तर, तीं खेरीज करून इतर ) कोणताही बारी पदार्थ हातांनीं इकडून तिकडे ठेवतेवेळीं कोणत्याही मनुष्यानें ज्यांस लोखंडी किंवा पोलादी चुका, टांचा, किंवा टोकें आहेत असे बूट अगर शूस घालतां कामा नयेत.

५.—कोणताही बारी पदार्थ भरतांना अगर उतरतांना, ज्या पिपांत व प्याकिजांत तो असेल तीं पिपें व प्याकिजें एकानें आपल्या हातांनीं उचलून दुसऱ्याच्या हातीं पोंचविलीं पाहिजेत, व तीं जमिनीवरून लोटून नेतां कामा नयेत; तीं फेंकतां कामा नयेत अगर उंचावरून खालीं टाकतां कामा नयेत, परंतु तीं जपून खालीं ठेवून रचून ठेविलीं पाहिजेत.

६.—बारी पदार्थ नेणें तो, त्या बारी पदार्थाचा बाहेरील बाजूकडून आगीच्या अपघातापासून पूर्तेपणीं बचाव होईल अशा रीतीनें चोहींकडून लांकडानें अगर धातूनें मढविलेल्या गाडीच्या आंतल्या बाजूंत, किंवा सदरहूप्रमाणें बचाव होईल अशा रीतीनें बंद केलेला सांधेबंद डेक ज्यास आहे अशा जहाजाच्या किंवा होडीच्या कोठींत भरलेला असल्याशिवाय नेऊं नये. बारी पदार्थ वर सांगितल्याप्रमाणें बंदोबस्तानें ठेवितां येत नसेल तर, आगीच्या स्पर्शापासून त्याचा पुरतेपणीं बचाव व्हावा ह्मणून तो चोहींकडून रोगणी कापड, टर्पालिन अगर इतर योग्य पदार्थ यांनीं आच्छादिला पाहिजे.

७.—बारी पदार्थ असलेल्या केसीचा गाडीच्या किंवा तारवाच्या ज्या भागास स्पर्श होत असेल, त्या भागाच्या आंतल्या बाजूस कोणत्याही प्रकारचें लोखंड अगर पोलाद, तें, कातडें, लांकूड, कापड अगर इतर योग्य पदार्थानें पुरतेपणीं मढविलेलें नसेल तर, असतां कामा नये.

८.—बारी पदार्थ रचून ठेवतांना, त्या बारी पदार्थास, अशा गाडींतून अगर तारवांतून आग अगर बार उत्पन्न करण्याजोगा जो कोणताही इतर जिन्नस अगर पदार्थ नेला जात असेल त्याचा स्पर्श होऊं नये अगर त्यापासून अपाय होऊं नये ह्मणून तो बारी पदार्थ, मध्यें पडदा घालून किंवा इतर प्रकारें, व तो जपून रचून, सुरक्षित करण्याची योग्य सावधगिरी ठेविली पाहिजे, व जर त्या बारी पदार्थास पाणी लागलें असतां भयंकर रीतीनें अपाय होण्याजोगा तो असेल तर, त्या बारी पदार्थास पाण्याचा संसर्ग होऊं नये अशाविषयीं योग्य सावधगिरी ठेविली पाहिजे.

९.—कोणत्याही एका गाडींतून अगर तारवांतून कोणत्याही एका वेळीं २००० रतलांहून अधिक परिमाणाचा बारी पदार्थ नेऊं नये; मात्र, जर गाडी चोहींकडून लांकडानें अगर धातूनें अशा रीतीनें मढविलेली असेल, अगर तारवास सांधेबंध डेक असून तें अशा रीतीनें बंद केलेलें असेल कीं त्यांतील बारी पदार्थाचा बाहेरील बाजूकडून आगीच्या अपघातापासून पुरतेपणीं बचाव होईल, तर त्यांतून जो बारी पदार्थ नेणें असेल त्याचें परिमाण पुढें सांगितल्यापेक्षां अधिक असतां कामा नये:

| | |
|---|---|
| रेलवेवरील कोणत्याही एका गाडींत | १० टन. |
| इतर कोणत्याही एका गाडींत | २ " |
| कोणत्याही एका तारवांत | २० " |

टीप.—रेलवेवरून डायनमाइट नेलें जात असेल तेव्हां त्या बाबतींत कानू ६, पारिग्राफ १२ याच्या अनुरोधानें ही कानू वाचली पाहिजे.

१०.—अपघात न होऊं देण्याबद्दल सर्व प्रकारची योग्य सावधगिरी ठेविली असल्यास, वर सांगितलेल्या ( १ ली कानू खेरीज करून इतर ) कानूंतील कोणताही ठराव ६ व्या ( युद्धसामग्रीच्या ) वर्गाच्या १ ल्या भागांतील कोणत्याही बारी पदार्थास लागू होणार नाहीं.

९. रेल्वेच्या द्वारें नसून इतर रीतीनें बारी पदार्थ नेले जात असतील तेव्हां त्या बाबतींत पुढील कानू पाळिल्या पाहिजेतः—

१. जी गाडी अगर होडी भाड्याचे उतारू नेत असेल अगर ते नेण्यासाठीं फिरत असेल तींतून, बारी पदार्थ, तो पांच रत्तलांहून कमी असल्याशिवाय व त्याबद्दल ती गाडी अगर होडी ताब्यांत असलेल्या इसमास पूर्वी सूचना दिली असल्याशिवाय सदर्हू गाडींतून अगर होडींतून, नेतां कामा नयेः

मात्र इतकेंच कीं, सदर्हू प्रकारच्या कोणत्याही गाडींतून अगर होडींतून खालीं सांगितलेले बारी पदार्थ खेरीज करून ९ व्या ( फल्मिनेटच्या ) वर्गांतील, अगर ६ व्या ( युद्धसामग्रीच्या ) वर्गाच्या ३ ऱ्या भागांतील अगर ३ ऱ्या ( नैट्रो-कांपौंडच्या ) वर्गाच्या १ ल्या भागांतील, कोणताही बारी पदार्थ नेतां कामा नयेः—

(१) डायनामाइट हें काडतुसांच्या रूपानें ५ रत्तलांपर्यंत नेण्यास हरकत नाहीं: मात्र त्याच खणांतून डिटोनेटर नेतां कामा नयेतः आणि

(२) १०० पर्यंत डिटोनेटर्सची संख्या; मात्र इतकेंच कीं, त्या डिटोनेटर्समधलें ९ व्या (फल्मिनेट) वर्गांतील बारी पदार्थाचें एकंदर परिमाण कोणत्याही बाबतींत ३ औंसांहून जास्त असतां कामा नये ( ज्या कंपनीच्या मुखत्यारानें पाठविण्यासाठीं ते डिटोनेटर्स स्वाधीन केले असतील त्यानें ह्याबाबद दाखला द्यावा ); आणखी असें कीं, त्याच खणांतून डायनमैट नेतां कामा नये.

२.—९ व्या ( फल्मिनेटच्या ) वर्गांतील, अगर ६ व्या ( युद्धसामग्रीच्या ) वर्गाच्या ३ ऱ्या भागांतील, अगर ७ व्या ( दारूकामाच्या ) वर्गाच्या १ ल्या भागांतील बारी पदार्थ, अगर ५ रत्तलांहून ज्यास्त परिमाणाचा इतर कोणताही बारी पदार्थ गाडींतून अगर तारवांतून नेण्याबाबद पुढें दिलेले नियम पाळिले पाहिजेतः

(१) सदर्हू गाडी अगर तारूं, तें ताब्यांत असलेल्या इसमानें कांहीं धोका होईल अशा रीतीनें अगर बेपरवाईनें हांकूं नये अगर चालवूं नये, व आग व स्फोट होऊं नये ह्मणून जी योग्य असेल ती सर्व प्रकारची सावधगिरी त्यानें ठेविली पाहिजे, व ज्यापासून आग अगर स्फोट होण्याचा संभव असेल व सदर्हू बारी पदार्थ नेण्याच्या बाबतींत किंवा सदर्हू नेण्याशीं ज्या कामाचा निकट संबंध आहे अशा कामाच्या बाबतींत ज्याची वास्तविक जरूरी नसेल असें कृत्य अगर गोष्ट सदर्हू बारी पदार्थांच्या संबंधानें कोणी करतां कामा नये; व जींत बारी पदार्थ नेला जात आहे अशी गाडी अगर असें तारूं, अमलानें गुंग झालेल्या मनुष्याच्या ताब्यांत असतां कामा नये, व त्यास त्या गाडींत, तिजवर किंवा तिच्या बरोबर अगर त्या तारवांत, त्यावर किंवा त्याबरोबर जाऊं देतां कामा नये.

(२) जो बारी पदार्थ न्यावयाचा उद्देश असेल त्याचें नांव व परिमाण, आणि कन्सैनीचें नांव व पत्ता हीं जींत दाखल केलीं आहेत अशा प्रकारची नोटीस कोणत्याही वखारवाल्यास अगर माल वाहणारास अगोदर दिल्याखेरीज व सदर्हू वखारवाला अगर माल वाहणारा तें कन्सैन्मेंट घेण्यास तयार असल्याविषयीं आपणास सूचना आल्याखेरीज कोणाही इसमानें सदर्हू वखारवाल्याच्या अगर माल वाहणाराच्या ताब्यांत देण्यासाठीं सदर्हू बारी पदार्थाचें कन्सैन्मेंट त्याकडे पाठवितां कामा नये; व सदर्हू कन्सैन्मेंट घेण्यास व तें तावडतोब पाठविण्यास, अगर ज्या मागझीनांत अगर ज्या जागेंत बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याविषयीं एकाद्या इसमास परवाना मिळाला असेल अशा जागेंत सदर्हू बारी पदार्थ ठेवण्यास आपणाकडून तयारी असल्याखेरीज कोणत्याही वखारवाल्यानें अगर माल वाहणारानें सदर्हू प्रकारची सूचना देऊं नये, अगर सदर्हू प्रकारचें कन्सैन्मेंट ताब्यांत घेऊं नये.

(३) तो बारी पदार्थ वाहून नेणारी गाडी अगर तारूं, कोणातरी एका लायक अगर पुरे होतील इतक्या लायक इसमांच्या ताब्यांत असली पाहिजे, अगर त्या गाडीबरोबर अगर तारवाबरोबर नेहेमीं कोणी तरी एका लायक किंवा पुरे होतील इतक्या लायक इसमांनीं असलें पाहिजे, व सदर्हू बारी पदार्थ १०० रत्तलांहून अधिक परिमाणाचा असल्यास सदर्हू इसमांनीं, ज्या जागीं राहिलें असतां लोकांस

विशेष प्रकारचा धोका होईल अशा जागीं वास्तविक रीतीनें जरूर असेल त्यापेक्षां जास्त वेळ पावेतों राहूं नये किंवा खोळंबूं नये, किंवा तेथें जरूर नसेल तर राहूं नये.

६. पुढील कानू सार्वजनिक रेलवेनें बारी पदार्थ नेण्याच्या संबंधानें पाळिल्या पाहिजेतः—

१.—बारी पदार्थांचें कोणतेंही कन्सैन्मेंट रेलवेनें नेलें जाण्यासाठीं पाठविण्याचा आपला उद्देश आहे अशी लेखी नोटीस रेलवे स्टेशन ताब्यांत असलेल्या अमलदारास अगोदर दिल्यावांचून व तें कन्सैन्मेंट घेतलें जाईल अशी रेलवेच्या अधिकार असलेल्या अमलदाराकडून लेखी सूचना आल्यावांचून कोणत्याही इसमानें तसें कन्सैन्मेंट सदहू कारणासाठीं पाठवूं नये; सदहू नोटिशीची मुदत रेलवे आडमिनिस्ट्रेशनाच्या मर्जीप्रमाणें ४८ तासांपर्यंत वाढवितां येईल व तींत जो बारी पदार्थ नेण्याचा उद्देश असेल त्याचें वास्तविक नांव, वर्णन, परिमाण व तो कोणत्या प्रकारें प्याक केला आहे तें, व आपलें स्वतःचें नांव व पत्ता, आणि तसेंच ज्या कन्सैनीकडे तो बारी पदार्थ पाठविण्याचा उद्देश असेल त्याचें नांव व पत्ता हीं सदहू इसमानें दाखल केलीं पाहिजेत.

२.—विवक्षित काळीं अमलांत असलेल्या कोणत्याही नोटिशीअन्वयें अगर नियमाअन्वयें जो बारी पदार्थ आपण घेणार नाहीं असें एकादें रेलवे आडमिनिस्ट्रेशन जाहीर करील तो बारी पदार्थ सदहू रेलवे आडमिनिस्ट्रेशनच्या कोणत्याही रेलवेकडे आणतां अगर पाठवितां किंवा त्या रेलवेवरून पुढें पाठवितां कामा नये.

३.—बारी पदार्थांचीं कन्सैन्मेंटें, ज्या स्टेशनाहून तीं पाठवावयाचीं असतील त्या स्टेशनावर सूर्योदय व सूर्यास्त यांच्या दरमियानच्या ज्या वेळा रेलवे आडमिनिस्ट्रेशन नेमील त्याच वेळीं पाठविलीं पाहिजेत व रेलवेच्या नोकरांनीं आपल्या ताब्यांत घेतलीं पाहिजेत; व कोणत्याही रेलवेनें जो कोणताही बारी पदार्थ नेण्याचा उद्देश असेल त्याचें प्रत्येक प्याकेज स्टेशनावर येऊन पोंहोंचल्यावरोवर लागलीच उतरून, स्टेशन ताब्यांत असलेला अमलदार विशेष रीतीनें हुकुम देईल त्याअन्वयें तें एकाद्या सुरक्षित स्थळीं ठेविलें पाहिजे.

जी कोणतीही बंदुकीची दारू कोणतें सरकारी आर्सेनल, डीपो अगर कारखाना पाठवीत असेल किंवा स्वाधीन करून घेत असेल, ती सगळी बंदुकीची दारू अशा आर्सेनलांत, डीपोंत अगर कारखान्यांत कामावर असलेल्या सरकारी नोकरांनीं रेलवेच्या व्हानींत भरली पाहिजे किंवा तशा व्हानींतून उतरून घेतली पाहिजे. बंदुकीची दारू एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्यासाठीं रेलवेनें उपयोग केलेल्या दरेक व्हानींत, दारूचीं प्याकेजें अशा बंदोबस्तानें ठेविलीं पाहिजेत कीं, ट्रेन चालू असतांना त्यांना धक्का बसूं नये.

४.—बारी पदार्थ, उतरण्याच्या स्टेशनावर येऊन पोंचल्यानंतर दिवसाच्या बारा तासांच्या आंत कन्सैनीनें तो तेथून नेला पाहिजे; ह्या शर्तीप्रमाणें सक्त रीतीनें वहिवाट करण्यांत न आल्यास सदहू कन्सैन्मेंन्ट कन्सैनरकडे परत पाठविण्याचा रेलवे आडमिनिस्ट्रेशनास अख्त्यार आहे, व सदहूप्रमाणें परत पाठविण्याचा खर्च व जोखीम हीं कन्सैनरवर राहतील; व सदहू प्याकेजें अशा मुदतींत, ज्या वागनींतून तीं आणिलीं असतील तींत स्टेशनच्या इमारतीपासून जितकीं दूर ठेववतील तितकीं दूर ठेविलीं पाहिजेत, अगर, तीं खालीं उतरलीं असल्यास तीं रोगणी कापडानें अगर इतर योग्य पदार्थांनें पूर्णपणें आच्छादिलीं पाहिजेत. व जरूर असल्यास तीं राखण्यासाठीं त्यांवर पोलीसचा पाहरा ठेवला पाहिजे.

५.—ज्या कोणत्याही प्याकेजांत सदरील नियमांविरुद्ध कोणताही बारी पदार्थ प्याक केला अगर पाठविला आहे असा रेलवे आडमिनिस्ट्रेशनास संशय येईल तीं प्याकेजें घेण्याचें नाकारण्याचा त्या आडमिनिस्ट्रेशनास अख्त्यार आहे. आणि रेलवे आडमिनिस्ट्रेशनला ज्या कोणत्याही प्याकेजांविषयीं संशय आला असेल तें प्याकेज कोणत्याही रेलवेवर असल्यास खरी स्थिति कळण्याकरितां, कन्सैनरवर त्याबाबद जोखम व खर्च ठेऊन सदहू प्याकेज फोडण्याचा अगर फोडावयास लावण्याचा त्या आडमिनिस्ट्रेशनास अख्त्यार आहे, व कन्सैनरकडे सदहू प्याकेजांतील बारी पदार्थ त्याजवर त्याबाबद जोखम व खर्च ठेवून परत पाठविण्याचा अख्त्यार आहे, व सदहू प्याकेजें परत पाठविलीं जात तोंपर्यंत तीं सदरील कानूंत ठरविलेल्या रीतीप्रमाणें ठेविलीं पाहिजेत.

६.—रकम (इ) हींत नमूद केलेला अपवाद लागू राहून, या कानूंत यापुढें निर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या बारी पदार्थांशिवाय इतर कोणताही बारी पदार्थ, ह्या कानूंत ह्यापुढें निर्दिष्ट केलेल्या रीतीशिवाय इतर रीतीनें पासेंजर ट्रेनींतून नेऊं नये:—

(अ) सेफ्टी काडतुसें व तोट्या व सेफ्टी फूज (सुरुंग लावण्यासाठीं), तसेंच, रेलवेच्या उपयोगासाठीं धुक्याच्या सिग्नली (निशाण्या); हे पदार्थ साधारण वागनींतून अगर गाड्यांतून नेण्यास हरकत नाहीं.

(ब) डायनमाइट; हा, काडतुसांच्या रूपानें ९ रत्तलपर्यंत नेण्यास हरकत नाहीं; मात्र त्याच खणांतून डिटोनेटर नेऊं नयेत.

(क) डिटोनेटर; हे २०० पर्यंत नेण्यास हरकत नाहीं; मात्र इतकेंच कीं, ज्यांत सदर्हू डिटोनेटर असतील अशा एका किंवा अनेक प्याकेजांतील पाऱ्याच्या फलिमिनेटाचें प्रमाण एकंदरानें कोणत्याही प्रसंगीं ३ औंसांहून अधिक असूं नये (व अशाविषयीं, ज्या कंपनीनें, पर्मनें अगर इसमानें ते डिटोनेटर एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं पाठविण्याकरितां स्वाधीन केलेले असतील तिनें अगर त्यानें किंवा तिच्या अगर त्याच्या मुखत्यारानें दाखला दिला पाहिजे); तसेंच, त्याच खणांतून डायनामाइट मुळींच नेऊं नये.

(ड) पूर्वी ठरविल्याप्रमाणें दुहेरी केसींमध्यें प्याक केलेली अशी शिकारीच्या कामाची बंदुकीची दारू अगर नान्-सेफ्टी काडतुसें नेण्यास हरकत नाहीं; मात्र ती बंदुकीची दारू, एकरतली टिनच्या डब्यांत भरलेली असून ते डबे, आंत ठिणगी मुळींच शिरणार नाहीं अशा रीतीनें बाहेरून कथलानें अगर जस्तानें मढविलेल्या मजबूत लांकडी केसींत, अगर रेलवे आडमिनिस्ट्रेशनानें पसंत केलेल्या नमुन्याच्या धातूनें मढविलेल्या केसींत प्याक केली असली पाहिजे. परंतु बाहेरील कोणत्याही केसींत २९ रतलांहून जास्त बंदुकीची दारू असूं नये, व एका ट्रेनींत बंदुकीच्या दारूचें अगर नान्सेफ्टी काडतुसांचें एकंदर कन्सैन्मेंट ८० रतलांहून जास्त असूं नये.

(इ). ज्या कोणत्याही लैनीवर गुड्स ट्रेनी चालत नसतील त्या लैनीवर पुढील शर्तींस अनुसरून मिक्स्ड ट्रेनींतून बारी पदार्थ नेण्याचा अधिकार आहे: ह्मणजे, एका मिक्स्ड ट्रेनीबरोबर बारी पदार्थ भरलेल्या एकाहून जास्त गाड्या एकेच वेळीं पाठवूं नयेत; गुड्स ट्रेनींतून बारी पदार्थ नेण्याच्या संबंधानें ठरविलेले पूर्वोपाय केले पाहिजेत; आणि लैनीच्या ज्या भागावर गुड्स ट्रेनी चालत असतील त्या भागावर बारीपदार्थांची वागन येतांच ती मिक्स्ड ट्रेनीपासून वेगळी काढिली पाहिजे.

७.—कोणत्याही रेलवे स्टेशनावर कोणत्याही एका वेळीं बारी पदार्थांच्या पांचांहून अधिक गाड्यांत बारी पदार्थ भरूं नयेत किंवा पांचांहून अधिक गाड्यांतील बारी पदार्थ उतरूं नयेत, अगर कोणत्याही एका ट्रेनीबरोबर बारी पदार्थ भरलेल्या पांचांहून अधिक गाड्या कोणत्याही एका वेळीं नेऊं नयेत; व कोणत्याही एका गाडींत जो बारी पदार्थ भरावयाचा त्याचें मान, ती गाडी बारी पदार्थ नेण्यासाठींच मुद्दाम तयार केलेली नसेल तर व ती हिंदुस्थान सरकारानें पसंत केलेली नसेल तर, नेहमींच्या ओझ्याच्या दोन-तृतीयांशाहून अधिक असूं नये. परंतु स्माल आर्म्सच्या युद्धसामग्रीच्या निरनिराळ्या कन्सैन्मेंटांस ह्या रकमेंतील कोणताही ठराव लागू आहे असें समजूं नये.

८.—कोणत्याहि लुसिफर अगर इतर आगकाड्या, फुजी, पैपलैट्स, आसिडें, नाप्था, पाराफिन, ज्यास पेट्रोलियम आक्ट (सन १८८६ चा १२ वा) अगर पेट्रोलियम आयात करणें, कबजांत ठेवणें, व एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेणें ह्याबाबदचा त्या त्या वेळीं अमलांत असणारा इतर कोणताही आक्ट लागू आहे असें पेट्रोलियम, अगर ज्यांतून पेट घेणारी वाफ निघण्यासारखी असेल किंवा जें आपोआप पेट घेण्यासारखें असेल किंवा ज्याच्यापासून अग्नि अगर स्फोट उत्पन्न होईल अगर पसरेल असें वाफ होऊन उडून जाणारें कोणतेंही इतर स्पिरिट अगर पदार्थ कोणत्याही बारी पदार्थाबरोबर एकाच गाडींतून नेतां कामा नये.

९.—सदर्हू बारी पदार्थ ३ ऱ्या अगर ४ थ्या वर्गाचा असल्यास, तो ठरविलेल्या इयत्तेप्रमाणें शुद्ध आहे, आणि याशिवाय, डायनमाइटच्या व नैट्रोग्लिसरीनपासून तयार केलेल्या सर्व संयुक्त पदार्थांच्या बाबतींत त्यांतून नैट्रोग्लिसरिन पाझरल्याचें किंवा तो पातळ झाल्याचें कांहींएक चिन्ह दिसत नाहीं असा, स्थानिक सरकारानें ह्याबाबद अधिकार दिलेल्या अमलदाराच्या सहीचा दाखला किंवा (खरेपणा पाहण्यास असल प्रत हजर केल्यास) त्याची नकल, कन्सैनरनें कन्सैन्मेंटच्या नोटीस जोडली पाहिजे. तसेंच, सदर्हू काडतुसें, इंग्लंडांत किंवा ब्रिटिश हिंदुस्थानांत, प्याक करण्याबाबद ज्या कानू अमलांत आहेत त्यांबरहुकुम प्याक केलेलीं आहेत असाही कन्सैनरनें दाखला दिला पाहिजे.

१०—वर्ग ३ व ४ यांतील बारी पदार्थांच्या बाबतींत, ज्या तारखेस ते बारी पदार्थ तयार केलेले असतील ती तारीख बाहेरील प्याकेजावर लिहिली पाहिजे. सर्व प्याकेजें सहज ओळखितां येण्यापुरती माहिती सदरीं सांगितलेल्या दाखल्यांत असली पाहिजे.

११—तपासणी १५ वी आक्टोबर व ३१ वी मार्च यांच्या दरमियान झाली असल्यास, ९ व्या कानूंत सांगितलेला दाखला, त्याजवरील तारखेपासून सहा महिनेपर्यंत व्यवहारोपयोगी होईल; परंतु एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्यासाठीं डायनमाइट घेणाऱ्या कोणत्याही रेलवे आडमिनिस्ट्रेशनास, १ ली एप्रिल व १५ वी आक्टोबर (दोन्ही धरून) यांच्या दरमियान डायनमाइट नेण्यासाठीं दिला असल्यास त्याबद्दल नवीन दाखला मागण्याचा अखत्यार आहे.

१२.—डायनमाइटचीं प्याकेजें फक्त एकच थर लावून रचलीं पाहिजेत व तीं, नेलीं जात असतांना हालणार नाहींत अशा रीतीनें सुरक्षित ठेविलीं पाहिजेत. व कोणत्याही एका वागनींतील ओझ्याचें ठोकमान ३ टनांहून जास्त असूं नये.

मात्र इतकेंच कीं, डायनमाइटचीं प्याकेजें काटकोन आकृतीचीं असलीं, व तीं नेलीं जात असतांना हालणार नाहींत अशा रीतीनें ठेविलेलीं असलीं, तर, तीं पांचांहून जास्त न होत इतकें कितीही थर लावून रचलीं असतां चालतील, आणि कोणत्याही एका वागनींतील ओझ्याचें ठोकमान ५ टनांहून जास्त असूं नये.

१३.—५ व्या (फल्मिनेटच्या) वर्गांतील अगर ६ व्या वर्गाच्या ३ ऱ्या भागांतील कोणताहि बारी पदार्थ, डायनमाइट बरोबर अगर ३ ऱ्या वर्गाच्या १ ल्या भागांतील इतर कोणत्याही बारी पदार्थाबरोबर एकाच ट्रेनींतून नेतां कामा नये.

१४.—बारी पदार्थ नेण्याच्या कामाच्या वागनी, त्यांत ठिणगीचा प्रवेश होण्यासारखा नाहीं असें व त्या भरण्यापूर्वीं साफ केल्या आहेत असें पाहण्यासाठीं, तपासल्या पाहिजेत. प्याकेजांना वरून गोणपाट अगर बुरणूस गुंडाळलें असेल तेव्हां अगर त्यांमध्यें कथलानें मढविलेल्या सर्व्हिस-प्याटर्न पेट्यांत प्याक केलेली स्माल आर्म्सची युद्धसामग्री भरली असेल तेव्हां खेरीज करून इतर प्रसंगीं, वागनीच्या तक्तपोशीवर व प्याकेजांच्या प्रत्येक थराच्या दरमियान हेअर-क्लॉथ, कातडीं, अगर इतर योग्य पदार्थ पसरला पाहिजे.

१५.—बारी पदार्थांच्या वागनी भरणें व रिकाम्या करणें त्या, स्टेशनच्या इमारतीपासून शक्य असेल तेवढ्या दूरच्या सायडिंगांत भरल्या व रिकाम्या केल्या पाहिजेत.

१६.—काटकोनाकृतीचीं व सारख्या आकाराचीं प्याकेजें (तीं दुहेरी असून नेलीं जात असतांना हालणार नाहींत अशा रीतीनें सुरक्षित ठेविलेलीं असलीं तर) त्यांचे पांच थर एकावर एक लावण्यास हरकत नाहीं. इतर प्रसंगीं बारी पदार्थांच्या प्याकेजांचे एकावर एक असे तिहींपेक्षां अधिक थर कधींही रचूं नयेत. परंतु कथलानें आंतून मढविलेल्या सर्व्हिस-प्याटर्न पेट्यांत प्याक केलेल्या स्माल आर्म्सच्या युद्धसामग्रीच्या बाबतींत मुळींच निर्बंध नाहीं. कानू ४ (३) यांतील ठरावांस अनुसरून, बारी पदार्थ भरण्याचें व उतरण्याचें काम एकदा सुरू केलें म्हणजे तें सगळें संपे तोंपर्यंत दक्षतेनें चालविलें पाहिजे.

१७.—जेव्हां डबे जोडून ट्रेन तयार करण्यांत येत असेल तेव्हां, बारी पदार्थांनीं भरलेल्या वागनी लोकोमोटिव्हनें शंट करण्यास हरकत नाहीं: मात्र इतकेंच कीं सदहू वागनी व एंजिन यांच्या दरमियान, ज्यांत कोणताही बारी पदार्थ अगर सहज पेट घेणारा पदार्थ भरलेला नाहीं अशा निदान तीन वागनी असाव्या; ही सावधगिरी बारी पदार्थ नेण्यासाठीं मुद्दाम तयार केलेल्यां वागनींच्या संबंधानें ठेवण्याची जरूरी नाहीं. सदहू [शंटिंगच्या] गतींच्या वेगाची मर्यादा दर तासास ५ मैल असावी, व योग्य रीतीनें अधिकार दिलेल्या अमलदारानें त्यावर देखरेख ठेवावी, व त्यास हे हुकुम पाळले जाण्याबाबद जबाबदार धरलें जाईल. फ्लाइंग (वेगानें) शंट करण्याची सक्त मनाई आहे.

१८. बारी पदार्थांच्या वागनी ट्रेनीच्या शेवटीं लोकोमोटिव्हपासून लांब ठेवल्या पाहिजेत, व त्या एकमेकींशीं व तसेंच जवळच्या वागनीशीं अगदीं लावून जोडल्या पाहिजेत, व त्यांच्या पुढें व मागें ज्यांत बारी पदार्थ अगर पेट घेणाऱ्या प्रकारचा इतर माल भरलेला नाहीं अशा तीन तीन वागनी असल्या पाहिजेत.

१९.—बारी पदार्थ एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं पाठविण्याच्या कामीं लावलेल्या वागनींस ब्रेक असतील तर त्यांवरील ब्रेकांचा, सदहू वागनी एकाद्या ट्रेनीबरोबर चालत असतांना कोणत्याही कारणावरून उपयोग करूं नये व

तसेंच सदर्हू वागनी वर सांगितल्याप्रमाणें चालत असतांना त्यांच्या अगदीं लगतच्या गाड्यांवरील लोखंडी ब्रेकांखेरीज इतर ब्रेकांचा उपयोग करूं नये.

२०.—वागनींत बारी पदार्थ भरले ह्मणजे, प्रत्येक बाबतींत, त्या वागनी कुलुपें लावून बंद केल्याच पाहिजेत.

२१.—जंक्शन स्टेशनांवर बारी पदार्थ एका रेलवेवरून दुसऱ्या रेलवेवर चढविण्याबाबदचीं सर्व कामें दिवसा उजेडीं झालीं पाहिजेत.

७.—बारी पदार्थ नेण्याच्या रीतीच्या संबंधाच्या सदरीं सांगितलेल्या कानूंपैकीं कोणतीही कानू कोणत्याही मनुष्यानें मोडल्यास, तो १०० रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

## आयात करणें.

८. बारी पदार्थ आयात करण्याबाबदच्या ह्या कानूंअन्वयें दिलेल्या परवान्यांतील शर्तीअन्वयें नसेल तर व त्या शर्तींस अनुसरून नसेल तर, बारी पदार्थ जलमार्गानें ब्रिटिश हिंदुस्थानांत आयात करतां कामा नयेत:

मात्र इतकेंच कीं, ११ व्या कानूंत सांगितलेल्या एकाद्या बारी पदार्थाखेरीज इतर कोणताही बारी पदार्थ, तो आयात करण्याबाबद परवाना देण्यापूर्वी तो ब्रिटिश म्यानुफ्याक्चरचा असल्याबद्दल दाखला दिलेला असल्यास, अगर, ब्रिटिश म्यानुफ्याक्चरचा नसेल तर युनैटैड किंगडममधून आयात केला असून इंग्लंडांतील बारी पदार्थांवरील मालिका माआझमांच्या इन्स्पेक्टरांपैकीं एकाद्यानें त्याबद्दल दाखला दिलेला असल्यास, ह्याबाबद स्थानिक सरकार जे नियम ठरवील त्यांअन्वयें जमिनीवर उतरण्यास हरकत नाहीं; व स्थानिक सरकार त्या कारणासाठीं जी जागा निराळी राखून ठेवील तींत सांठविण्यास हरकत नाहीं. जो बारी पदार्थ ब्रिटिश म्यानुफ्याक्चरचा नसून ज्याच्या संबंधानें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची अशी खात्री आहे कीं तो योग्य अमलदारांच्या देखरेखीखालीं तयार केलेला आहे अशा कोणत्याही बारी पदार्थास सदर्हू सवलत लागू करितां येईल.

ह्या कानूंतील विशेष ठरावाअन्वयें कोणताही बारी पदार्थ जमिनीवर उतरण्यापूर्वी, तो ठरविलेल्या परीक्षेस न उतरला तर त्याच्या व्यवस्थेबद्दल स्थानिक सरकारास जे हुकूम करणें योग्य आहेत असें वाटेल ते मी पाळीन अशाविषयीं कन्सैनीनें बंदरच्या चीफ कस्टमस ऑफिसरास तारणासह किंवा तारणाशिवाय सदर्हू ऑफिसरास योग्य दिसेल त्याप्रमाणें, हमी दिली पाहिजे.

तारूं येऊन पोंचल्यानंतर त्यावर कस्टमच्या मुख्य अमलदारानें पाठविलेल्या अमलदारानें नमुने घेतले तर काम चालवावयाचें तें कानू १९ ह्यांत ठरविलेल्या रीतीनें चालविलें पाहिजे.

९. जो कोणताही मनुष्य ८ व्या कानूविरुद्ध बारी पदार्थ आयात करील तो तीन हजार रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

१०. कलकत्ता, मद्रास, मुंबई, रंगून, कालिकत, कराची, व एडन ह्या बंदरांखेरीज इतर ठिकाणीं जलमार्गानें बारी पदार्थ आयात करतां कामा नये; परंतु आक्याब, मौलमीन, सांडोवे, क्यौक-फ्यू, टव्हॉय, व मर्ग्युइ हीं बंदरें अनुक्रमें ज्या ज्या जिल्ह्यामध्यें असतील तेथील माजिस्ट्रेटांस, रंगुनाहून त्या त्या बंदरांस बारी पदार्थ आणण्यासाठीं लैसेन्स देण्याचा अख्त्यार आहे. सदर्हू प्रकारच्या प्रत्येक लैसेन्साबद्दल द्यावयाची फी एक रुपया असून, ह्याबरोबर दिलेल्या परिशिष्टांतलि अ नमुन्याप्रमाणें सदर्हू लैसेन्स असावा.

११. बारी पदार्थ बंदुकीची दारू असेल अगर ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील बारी पदार्थ अगर ७ व्या (दारू कामाच्या) वर्गांतील बारी पदार्थ असेल तर, तो आयात करण्याबद्दलचा लैसेन्स, कलकत्ता, मद्रास, व मुंबई ह्या बंदरीं कमिशनर ऑफ् पोलीस ह्यांनीं, व रंगून, कालिकत, कराची आणि एडन ह्या बंदरीं जिल्हा माजिस्ट्रेटानें दिला असतां चालेल.

१२. सदर्हू प्रकारच्या प्रत्येक लैसेन्साबाबद फी १० रुपये दिली पाहिजे. परंतु, कोणत्याही ब्रिटिश बंदरांत लैसेन्साअन्वयें आयात केलेला कोणताही बारी पदार्थ, तेथून कानू १० हींत सांगितलेल्या दुसऱ्या ब्रिटिश बंदरास निर्गत केला, तर तो ह्या प्रमाणें पुनः आयात करण्यास लागणारा लैसेन्स, १० रुपयांऐवजीं १ रुपया फी दिली ह्मणजे देण्याचा अधिकार आहे.

१३. ११ व्या कानूंत सांगितलेल्या बारी पदार्थांशिवाय इतर कोणताही बारी पदार्थ जलमार्गानें आयात करण्याबाबद लैसेन्स स्थानिक सरकार अगर स्थानिक सरकारानें ह्याबाबद विशेष अधिकार दिलेला इतर कोणताही अमलदार यांणीं दिले पाहिजेत.

१४. कानू १३ हींत वर्णन केलेल्या प्रकारच्या कोणत्याही बारी पदार्थाबद्दल हिंदुस्थान सरकारानें किंवा त्याच्या हुकुमावरून परीक्षा ठरविलेली असली तर, ह्यांत पुढें ठरविल्याप्रमाणें घेतलेले त्या बारी पदार्थांचे मासले वेळोवेळीं ठरविलेल्या परीक्षेस उतरले असल्याबद्दल केमिकल एक्झामिनरचा अगर ह्याबाबद स्थानिक सरकारानें नेमिलेल्या इतर अमलदाराचा दाखला असल्याखेरीज सदर्हू बारी पदार्थ आयात करण्याबाबद लैसेन्स दिला जाणार नाहीं.

१५. ११ व्या कानूंत सांगितल्या प्रकारच्या बारी पदार्थांशिवाय इतर बारी पदार्थ ज्यावर आहे असें तारूं जेथें बारी पदार्थ आयात करणें कायदेशीर आहे अशा कोणत्याही बंदरांत येऊन पोंचल्याबरोबर, चीफ कस्टम्स ऑफिसर ह्याबाबद ज्यास अधिकार देईल अशा अमलदारानें होईल तितके लवकर त्या तारवावर जाऊन, गेल्या शेवटल्या कानूअन्वयें त्या बारी पदार्थांची परीक्षा करणें जरूर असल्यास, त्या बारी पदार्थांचे नमुने घेतले पाहिजेत.

ज्या बारी पदार्थांचे नमुने परीक्षेकरितां घेण्यांत येतील, ते सर्व बारी पदार्थ, ताबडतोब, योग्य रीतीनें लैसेन्स दिलेल्या एका अगर अनेक जागीं, नेऊन ठेविले पाहिजेत, आणि ते वापरण्यासाठीं वांटून देण्यास हरकत नसल्याबद्दलची नोटीस, लैसेन्स देणाऱ्या अधिकाऱ्याकडून, आयात करणाऱ्यास पोंचे तोंपर्यंत, ते तसे वांटून देतां कामास नये.

त्या तारवाच्या मास्तरानें सदर्हू अमलदारास जे नमुने पाहिजे असतील त्यांबद्दल त्याजपासून किंमत न घेतां त्यास ते दिले पाहिजेत. सदर्हू अमलदारानें सदर्हू प्रत्येक नमुन्यावर त्या तारवाचें नांव व कप्तानीचें नांव व त्यास जरूर वाटतील अशा ओळखीसाठीं इतर खुणा केल्या पाहिजेत, व तो केमिकल एक्झामिनरकडे अगर पूर्वी सांगितल्या प्रकारच्या अमलदाराकडे रिपोर्टासाठीं पाठविला पाहिजे.

केमिकल एक्झामिनर अगर पूर्वी सांगितल्या प्रकारचा अमलदार यानें, सदर्हू नमुन्यांची परीक्षा करून, विलंब न लावितां, लैसेन्स देणाऱ्या अधिकाऱ्याकडे, चीफ कस्टम्स ऑफिसरच्या मार्फत आपल्या सहीचा, सदर्हू बारी पदार्थ ठरविलेल्या परीक्षेस उतरला आहे कीं नाहीं याबद्दलचा दाखला देऊन रिपोर्ट पाठवावा.

१५ अ.—कानू ११ हींत उल्लेख केलेल्या बारी पदार्थांव्यतिरिक्त जे इतर बारी पदार्थ, कानू १४ व १५ ह्यांत सांगितलेल्या परीक्षेस, कलकत्ता, मद्रास, मुंबई, रंगून, कालिकत, कराची, अगर एडन येथें उतरले असतील, ते, पुनः परीक्षा केल्याशिवाय, कानू १३ ह्याअन्वयें दिलेल्या लैसेन्सावरहुकुम, सदर्हू बंदरांपैकीं कोणत्याही इतर बंदरीं जलमार्गानें पुनः आयात करण्यास हरकत नाहीं; मात्र, कानू ६, रकम ९, ह्यांत सांगितलेल्या बारी पदार्थांच्या बाबतींत त्या रकमेंत सांगितलेला दाखला हजर केला पाहिजेः

सदर्हू परीक्षा तारीख १५ आक्टोबर व ३१ मार्च यांच्या दरमियान झालेली असल्यास, असा दाखला त्याजवरील तारखेपासून सहा महिनेपर्यंत व्यवहारोपयोगी होईल; परंतु डायनामाईटच्या बाबतींत, कन्सैन्मेंट जर तारीख १ एप्रिल व १५ आक्टोबर (दोन्ही दिवस धरून) यांच्यां दरमियान आयात केलेलें असेल, तर, नवीन दाखला मागण्याचा अख़्त्यार आहे.

१६. बारी पदार्थ आयात करण्याबाबद १३ व्या कानूअन्वयें दिलेला लैसेन्स ज्या मुदतीपावेतों अमलांत असावयाचा ती मुदत लैसेन्स देणाऱ्या अधिकाऱ्यास जरूर दिसेल त्याहून अधिक असूं नये.

१७. १३ व्या कानूअन्वयें दिलेल्या लैसेन्साबद्दल देणगीची फी १० रुपये असावी. परंतु कोणत्याही ब्रिटिश बंदरांत लैसेन्साअन्वयें आयात केलेला कोणताही बारी पदार्थ त्या बंदरांहून १० व्या कानूंत सांगितलेल्या कोणत्याही दुसऱ्या बंदरास निर्गत करण्यांत आला, तर, ह्याप्रमाणें पुनः आयात करावयास लागणारा लैसेन्स १० रुपयांच्या ऐवजीं एक रुपया दिला असतां देण्यास हरकत नाहीं.

१८. ११व्या व १३व्या कानूंअन्वयें दिलेला प्रत्येक लैसेन्स ह्यास जोडलेल्या परिशिष्टांतील अ नमुन्याप्रमाणें असला पाहिजे, व तो त्यांत ठरविलेल्या शर्तीस, व तो बारी पदार्थ उतरण्याची, जमिनीवर आणण्याची, देण्याची व

नेण्याची वेळ व जागा ह्यांसंबंधानें जास्ती शर्तींसही, व लैसेन्स देणाऱ्या अधिकाऱ्यास लोकांच्या संरक्षणासाठीं अगर सरकारच्या हितासाठीं प्रत्येक बाबतींत जरूर वाटतील अशा इतर शर्तींसही पात्र राहील.

१९. ११व्या व १३व्या कानूंखालील लैसेन्स ज्या शर्तींस पात्र ठेवून दिला असेल तशा कोणत्याही शर्तींचा जो कोणताही मनुष्य भंग करील तो तीन हजार रुपयेपर्यंत दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

## सामान्य कानू.

२०. ह्या कानूंअन्वयें दिलेला प्रत्येक लैसेन्स, ज्या शर्तींस पात्र करून तो दिला असेल त्या शर्तींतून कोणत्याही शर्तींचें उल्लंघन केल्यास, रद्द होण्यास पात्र होईल असें समजावें.

२१. बारी पदार्थ आयात करण्यास लैसेन्स मिळालेला कोणी मनुष्य जर मरण पावेल, किंवा नादार होईल किंवा मनानें असमर्थ अगर इतर रीतीनें अपंग होईल तर, अशा लैसेन्सवाल्याचें काम चालविणाऱ्या मनुष्यास, असल लैसेन्स चालू असावयाच्या शिल्लक राहिलेल्या मुदतींत आपल्या स्वतःच्या नांवानें नवीन लैसेन्स मिळण्यासाठीं लैसेन्स देणाऱ्या अधिकाऱ्याकडे अर्जी करण्यास वाजवी रीतीनें जरूर असेल तेवढ्या वेळांत सदहू लैसेन्साअन्वयें काम करण्याबद्दल, तो मनुष्य हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) याअन्वयें किंवा त्याअन्वयें केलेल्या कानूंअन्वयें कोणत्याही शिक्षेस, किंवा त्याचा सदहू लैसेन्स रद्द केला जाण्यास, पात्र होईल असें समजूं नये. असा नवीन लैसेन्स एक रुपया दिला असतां, देण्यांत येईल.

२२. ह्या कानूंअन्वयें घ्यावयाच्या फी वठविलेल्या स्टांपांच्या रूपानें घेतल्या पाहिजेत. साधारणतः, लैसेन्सासाठींच्या किंवा लैसेन्स नवीन करून देण्यासाठींच्या अर्ज्या, दुसऱ्या रीतीनें ठराव केला नसेल तर, अशा लैसेन्साबाबद किंवा तो नवीन करून देण्याबाबद घ्यावयाच्या फीच्या रकमे इतक्या किंमतीच्या वठविलेल्या स्टांपांवर लिहिल्या पाहिजेत; आणि लैसेन्स देणें ते साध्या कागदावर दिले पाहिजेत. परंतु जेव्हां लैसेन्सच वठविलेल्या स्टांपांवर लिहिले किंवा छापले असतील तेव्हां अर्जी करणें ती साध्या कागदावर करण्याचा अधिकार आहे. जेव्हां लैसेन्सासाठीं अर्जी वठविलेल्या स्टांपावर लिहिली असेल आणि लैसेन्स देण्याचा इन्कार केला असेल तेव्हां त्या स्टांपाची किंमत अर्जदारानें अर्जी केली असतां त्यास परत दिली पाहिजे.

२३. ह्या कानूंअन्वयें दिलेला लैसेन्स हरवला असेल किंवा अकस्मात् नाश पावला असेल तेव्हां आठ आणे फी दिली असतां त्याची नक्कल लैसेन्सवाल्यास देण्याचा अधिकार आहे.

२४. जो कोणताही मनुष्य ह्या कानूंस अनुसरून दिलेला लैसेन्स धारण करीत असेल किंवा तशा लैसेन्साअन्वयें काम करीत असेल, त्या मनुष्यास तो लैसेन्स हजर करण्याविषयीं कोणत्याही माजिस्ट्रेटानें किंवा पोलिसठाणें स्वाधीन असणाऱ्या कोणत्याही पोलीस अमलदारानें किंवा त्याच्याहून वरच्या दरज्याच्या कोणत्याही पोलीस अमलदारानें फर्माविलें असतां त्याप्रमाणें करणें त्या मनुष्यास भाग आहे असें समजावें.

२५. ह्या कानूंअन्वयें काम करणारे सर्व माजिस्ट्रेट व इतर अधिकारी हे आपआपल्या वरिष्ठांच्या व स्थानिक सरकारच्या निर्बंधास पात्र राहून आपआपलीं कामें करतील.

२६. सदरील कानूंअन्वयें कोणताही लैसेन्स देण्याचा अखत्यार मिळालेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास योग्य वाटेल तर, त्याला, तो लैसेन्स, हिंदुस्थानचा हत्यारांविषयींचा आक्ट (सन १८७८ चा ११वा) याअन्वयें दिलेल्या लैसेन्सासारखाच चालेल असें, त्या लैसेन्सावर लेखी हुकुम करून, फर्माविण्यास अखत्यार आहे.

२७. हिंदुस्थानचा हत्यारांविषयींचा आक्ट (सन १८७८चा ११वा) यांत युद्धसामग्री या शब्दाची ज्याप्रमाणें व्याख्या केली आहे तशा युद्धसामग्रीच्या सदराखालीं येणारा कोणताही बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याचा ज्या कोणत्याही मनुष्यास तो आक्ट किंवा त्याअन्वयें केलेल्या कानू यांवरून कायदेशीर रीतीनें हक्क असेल, त्या मनुष्याला आपल्या स्वतःच्या खासगी उपयोगासाठीं वाजवी मानानें तसा कोणताही बारी पदार्थ, ह्या कानूंअन्वयेंच्या लैसेन्सावांचून, कबज्यांत ठेवण्याचा अगर बाहेरून आणण्याचा अधिकार आहे : परंतु अशा रीतीनें बारी पदार्थ बाहेरून आणिला असेल तेव्हां, कलेक्टर ऑफ् कस्टम यास, अगर नांवानें अगर अधिकाराच्या नात्यानें ज्या इतर अमलदारास स्थानिक सरकार अधिकार देईल त्यास, स्थानिक सरकारचे त्याबाबद हुकुम त्यास होत तोंपावेतों सदहू बारी पदार्थ कोणत्याही वेळीं अटकावून ठेवण्याचा अखत्यार आहे.

## नमुना अ.

(११, १३ व १८ ह्या कानू पहा.)

फी दहा रुपये, स्टांपांच्या रूपानें.

———— बंदरांत बारी पदार्थ आयात करण्याविषयीं लैसेन्स.

| लैसेन्स धारण करणाराचें नांव वगैरे व पत्ता. | प्याकेजांची संख्या | बारी पदार्थ. वर्णन. | वजन. | संख्या | कोणत्या कारणासाठीं पाहिजे तें. | जेथें आणावयाचा तें ठिकाण. | लैसेन्स ज्या मुदतीपर्यंत व्यवहारोपयोगी राहील ती मुदत. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | सन १८९ माहे ———— च्या ———— वे तारखेपासून ———— च्या सन १८९ माहे ———— ———— वे तारखे पर्यंत. |

तारीख ————
माहे ————
सन १८९

(शिक्का.)

(सही).
———— चे ————

### शर्ती.

१. हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट, (सन १८८४ चा ४ था) याच्या व त्या अन्वयें केलेल्या कानूंच्या ठरावांस पात्र ठेऊन हा लैसेन्स दिला आहे. विवक्षित सामान्य कानू याखालीं निराळे उतरले आहेत.

२. ह्या लैसेन्सांत सांगितलेली मुदत गुदरून गेल्यावर तो रद्द होईल.

३. हा लैसेन्स आयात करण्याबद्दल मात्र व्यवहारोपयोगी आहे; ह्यांत सांगितलेले जिन्नस इलाका शहराच्या बाहेरील कोणत्याही ठिकाणीं न्यावयाचे असल्यास त्याबद्दल हिंदुस्थानचा हत्यारांबाबदचा आक्ट (सन १८७८ चा ११ वा) याअन्वयें केलेल्या कानूंस अनुसरून काढलेल्या बारी पदार्थ एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं न्यावयाचाबदच्या लैसेन्साचा आधार असला पाहिजे.

४. प्रत्येक प्याकेजाच्या बाहेरच्या बाजूस 'बारी पदार्थ' हे शब्द डाग देऊन किंवा नांवाची चिठी किंवा इतर निशाणी मजबूत जडवून ढळढळीत अक्षरांनीं लावावे. व त्यांपुढें त्या बारीपदार्थांचें नांव अगर आंतील पदार्थांचें इतर वर्णन व मालकांचीं अगर पाठविणारांचीं नांवें व पत्ते हीं यावीं.

### सामान्य कानू.

* * * *

२०. ह्या कानूंअन्वयें दिलेला प्रत्येक लैसेन्स, ज्या शर्तींस पात्र करून तो दिला असेल त्या शर्तींतून कोणत्याही शर्तीचें उल्लंघन केल्यास, रद्द होण्यास पात्र होईल असें समजावें.

२१. बारी पदार्थ आयात करण्यास लैसेन्स मिळालेला कोणी मनुष्य जर मरण पावेल, किंवा नादार होईल किंवा मनानें असमर्थ अगर इतर रीतीनें अपंग होईल तर अशा लैसेन्सवाल्याचें काम चालविणाऱ्या मनुष्यास, असल लैसेन्स चालू असावयाच्या शिलक राहिलेल्या मुदतींत आपल्या स्वतःच्या नांवानें नवीन लैसेन्स मिळण्यासाठीं लैसेन्स देणाऱ्या अधिकाऱ्याकडे अर्जी करण्यास वाजवी रीतीनें जरूर असेल तेवढ्या वेळांत सदर्हू लैसेन्साअन्वयें काम करण्याबद्दल, तो मनुष्य हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) याअन्वयें किंवा त्या-

अन्वयें केलेल्या कानूंअन्वयें कोणत्याही शिक्षेस, किंवा त्याचा सदहू लैसेन्स रद्द केला जाण्यास, पात्र होईल असें समजूं नय. असा नवीन लैसेन्स एक रुपया दिला असतां देण्यांत येईल.

२२. ह्या कानूंअन्वयें घ्यावयाच्या फी वठविलेल्या स्टांपांच्या रूपानें घेतल्या पाहिजेत. साधारणतः लैसेन्सासाठींच्या किंवा लैसेन्स नवीन करून देण्यासाठींच्या अर्ज्या, दुसऱ्या रीतीनें ठराव केला नसेल तर, अशा लैसेन्सांबावद किंवा ते नवीन करून देण्याबावद घ्यावयाच्या फीच्या रकमेइतक्या किंमतीच्या वठविलेल्या स्टांपांवर लिहिल्या पाहिजेत; आणि लैसेन्स देणें ते साध्या कागदावर दिले पाहिजेत. परंतु जेव्हां लैसेन्सच वठविलेल्या स्टांपांवर लिहिले किंवा छापले असतील तेव्हां अर्जी करणें ती साध्या कागदावर करण्याचा अधिकार आहे. जेव्हां लैसेन्सासाठीं अर्जी वठविलेल्या स्टांपांवर लिहिली असेल आणि लैसेन्स देण्याचा इन्कार केला असेल तेव्हां त्या स्टांपाची किंमत अर्जदारानें अर्जी केली असतां त्यास परत दिली पाहिजे.

२३. ह्या कानूंअन्वयें दिलेला लैसेन्स हरवला असेल किंवा अकस्मात् नाश पावला असेल तेव्हां आठ आणे फी दिली असतां त्याची नकल लैसेन्सवाल्यास देण्याचा अधिकार आहे.

२४. जो कोणताही मनुष्य ह्या कानूंत अनुसरून दिलेला लैसेन्स धारण करीत असेल किंवा तशा लैसेन्साअन्वयें काम करीत असेल, त्या मनुष्यास तो लैसेन्स हजर करण्याविषयीं कोणत्याही म्याजिस्ट्रेटानें किंवा पोलिसठाणें स्वाधीन असणाऱ्या पोलीस अमलदारानें किंवा त्याच्याहून वरच्या दरज्याच्या कोणत्याही पोलीस अमलदारानें फर्माविलें असतां त्याप्रमाणें करणें त्या मनुष्यास भाग आहे असें समजावें.

---

## बारी पदार्थांची परीक्षा करण्यासाठींच्या कानूचा मसुदा.

होम डिपार्टमेंटचा जाहिरनामा नंबर यांत, बारी पदार्थ एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्याच्या व ते आयात करण्याच्या कामाचें नियमन करण्यासाठीं ज्या कानू प्रसिद्ध केल्या आहेत त्या कानूंपैकीं कानू १४ ची हीस अनुलक्षून, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं, बारी पदार्थ आयात करूं देण्यापूर्वी ते ज्या परीक्षेस उतरले पाहिजेत त्या परीक्षेसंबंधानें, खालील कानू केली आहे.

### कानू.

वर्ग १.—बंदुकीच्या दारूचा वर्ग. बंदुकीच्या दारूची परीक्षा करण्याची जरूरी नाहीं.

वर्ग २.—नैट्रेट-मिक्श्चरचा वर्ग. साधारणपणें, नैट्रेट-मिक्श्चरच्या वर्गाच्या बारी पदार्थांची परीक्षा करण्याची जरूरी नसते. परंतु, स्थानिक सरकारास, अगर, होम डिपार्टमेंटचा जाहिरनामा नंबर तारीख १८९६, ह्यांत, बारी पदार्थ एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्याच्या व ते आयात करण्याच्या कामाचें नियमन करण्यासाठीं ज्या कानू प्रसिद्ध केल्या आहेत, त्या कानूंपैकीं १३ व्या कानूअन्वयें बारी पदार्थ आयात करण्याचा लैसेन्स देणाऱ्या अधिकार दिलेल्या अमलदारास, कोणत्याही विवक्षित बाबतींत किंवा विवक्षित वर्गाच्या बाबतींत, असा हुकूम करण्याचा अधिकार आहे कीं, आयात करावयाच्या बारी पदार्थाचा एक नमुना, त्या पदार्थाच्या घटकांचें पृथक्करण करण्यासाठीं, पहिल्या प्रथम, केमिकल एक्झामिनरकडे पाठवावा.

वर्ग ३.—नैट्रो-कांपौंडचा वर्ग. परीक्षा करावी लागते ती, मुख्यत्वेंकरून, ह्या वर्गांतील बारी पदार्थांची रचना शुद्ध आहे किंवा कसें तें पाहण्यासाठीं व ते पातळ होण्यास अगर त्यांतला द्रव पाझरण्यास पात्र आहेत कीं काय तें पाहण्यासाठीं, करावी लागते. नैट्रो-कांपौंड वर्गाच्या बारी पदार्थांसाठीं ठरविलेली परीक्षा ह्या कानूस जोडलेल्या अ परिशिष्टांत दिली आहे.

वर्ग ४.—क्लोरेट-मिक्श्चरचा वर्ग. ह्या वर्गाच्या परीक्षेसंबंधाचा मजकुर पाहण्याचा असल्यास परिशिष्ट भ पहा. (अ)

वर्ग ५.—फलिमनेटचा वर्ग. फलिमनेटचा वर्गाच्या बारी पदार्थांसाठीं परीक्षा ठरविली नाहीं. (अ)

वर्ग ६.—युद्धसामग्रीचा वर्ग. ह्या वर्गाच्या १ ल्या भागांतील बारी पदार्थांसाठीं कोणत्याही परीक्षेची जरूरी नाहीं. २ ऱ्या आणि ३ ऱ्या भागांतील बारी पदार्थांच्या घटकावयवांची सदरील कानूंअन्वयें परीक्षा करणें झाल्यास, ते बारी पदार्थ कोणत्याही डब्यांत किंवा युक्तीच्या साधनांत भरलेले असल्या कारणानें युद्धसामग्रीच्या वर्गाच्या १ ल्या भागांत त्यांचा समावेश होत असला तरी, ते सदरीलप्रमाणेंच परीक्षेस पात्र होतील.

---

(अ) ह्या वर्गाचे कोणतेही बारी पदार्थ ब्रिटिश हिंदुस्थानांत आयात करण्यास हल्लीं लैसेन्स देत नाहींत.

वर्ग ७.—दारूकामाचा वर्ग. ह्या वर्गातील बारी पदार्थांची परीक्षा करण्याची जरूरी नाहीं.

## परिशिष्ट अ.


## नैट्रो-कांपौंड वर्गातील बारी पदार्थांकरितां उष्णतेची परीक्षा.

### साधारण समजुती.


### परीक्षेला लागणारी यंत्रसामग्री.

१. या परीक्षेला एक पाणी तापविण्याचें भांडें लागतें. हें भांडें ह्मटलें ह्मणजे, एक कांचेचें किंवा तांब्याचें सुमारें ८ इंच व्यासाचें, गोलाकृति पात्र ( आकृति १, अ) असतें आणि त्याच्या तोंडाचा व्यास सुमारें ९ इंच असतो. तें कांठाकडून एक चतुर्थांश इंच सोडून बाकीचें पाण्यानें भरतात. त्या भांड्यावर तांब्याच्या पत्र्याचें सुमारें ६ इंच व्यासाचें एक सुटें झांकण (ब) असतें, व तें पात्र, एक सुमारें १४ इंच उंचीची तिपायी बैठक (क) हिच्यावर ठेवलेलें असतें; या बैठकीवर एक जाड्या लोखंडी तारेची जाळी (ई) घातलेली असून तिच्या ( बैठकीच्या ) सभोंवती कथलाच्या किंवा तांब्याच्या पातळ पत्र्याचा एक पडदा (ड) असतो. या बैठकीच्या आंत कांचेची चिमणी असलेला एक आर्गंड दिवा (फ) ठेवितात. झांकण (ब) यांत २ ऱ्या आकृतीमध्यें दाखविलेल्या व्यवस्थेप्रमाणें, चार छिद्रें असतात. त्यांपैकीं नं० ४ मध्यें रेग्युलेटर, नं० ३ मध्यें उष्णतामापक यंत्र, आणि नं० १ व २ यांमध्यें, परीक्षा करावयाचा गन-काटन किंवा इतर पदार्थ ज्यांत घेतलेला असतो त्या परीक्षेच्या नळ्या, अशीं ठेवावयाचीं असतात. छिद्रें १ व २ यांसभोंवती, झांकणाच्या खालच्या बाजूस, पितळेच्या तारेचे तीन तुकडे डांक लावून बसविलेले असतात व त्यांचीं टोकें आंतल्या बाजूस थोडीशीं एकमेकांजवळ आलेलीं असतात. ( आकृति ३ ); या तारेच्या तुकड्यांचा कमानी ( स्प्रिंग ) प्रमाणेंच उपयोग होत असल्याकारणानें, परीक्षेच्या नळ्या सहज रीतीनें ठिकाणावर ठेवतां येतात व काढतां येतात.

आकृति १





आकृति २




आकृति ३



आकृति ४



* २. शीब्लेरचा किंवा पेजचा टेंपरेचर रेग्युलेटर असावा.

*३. लीक्लान्चीची व्याटरी नं० १ हिचीं दोन पात्रें (सेल) } शीब्लेरच्या रेग्युलेटरचा उपयोग करीत असल्यास.
*४. सुताचें वगैरे वेष्टण असलेली कांहीं यार्ड तांब्याची तार }

५. ९$\frac{1}{2}$ पासून ९$\frac{3}{4}$ इंच लांबीच्या आणि ९ इंच उंचीपर्यंत भरल्या असतां ज्यांत २० पासून २२ घन सेंटिमीटर पाणी राहील अशा व्यासाच्या परीक्षेच्या नळ्या.

६. परीक्षेच्या नळ्यांला नीट बसण्याजोगे इंडिया रबरचे बूच. ह्यांत, परीक्षेचा कागद धरण्यासाठीं योजना केलेली असावी. ह्मणजे, बुचामधून एक कांचेची बारीक नळी घातलेली असावी व तिचें टोंक ओढून त्याचा आंकडा केलेला असावा किंवा तिच्या शेवटीं एक प्लाटिनमच्या तारेचा आंकडा असावा. (आकृति ४.)

७. निदान फा. ३०°पासून २१२°पर्यंत उष्णतामान दाखविणारें एक उष्णतामापक यंत्र असावें.

८. मिनिटें दाखविणारें एक घड्याळ असावें.

## परीक्षेला लागणारें साहित्य.

अ. **परीक्षेचा कागदः** हा पुढीलप्रमाणें तयार करावा:—४९ ग्रेन मक्याचें पांढरें सत्त्व पहिल्यानें थंड पाण्यानें धुवून ८$\frac{3}{4}$ अंस शुद्ध पाण्यांत घालावें, आणि तें मिश्रण ढवळावें व खतखतेपर्यंत तापवावें, आणि १० मिनिटेंपर्यंत सावकाश खतखतत ठेवावें. तसेंच, १९ ग्रेन शुद्ध ऐओडैड आफ् पोट्याशियम (ह्मणजे, जें आल्कोहोलमध्यें विरवून त्यांतून सांख बसवून पुनः काढिलें आहे तें) ८$\frac{3}{4}$ अंस शुद्ध पाण्यांत विरवावें. मग हीं दोन्ही मिश्रणें चांगलीं मिसळावीं आणि थंड होऊं द्यावीं. याप्रमाणें तयार केलेल्या या मिश्रणामध्यें, पांढऱ्या इंग्लिश गाळण्याच्या कागदाच्या चिरोट्या किंवा ताव पहिल्यानें धुवून व वाळवून, बुडवावे आणि त्यांत निदान १० सेकंडपर्यंत राहूं द्यावें. नंतर रसायनशालेंतल्या वाफा व धूळ जेथें नसेल अशा जागीं त्यांस निथळून वाळूं द्यावें. ह्या चिरोट्यांच्या किंवा तावांच्या खालच्या व वरच्या कडा कापून काढून ते कागद, कांचेचे किंवा कार्कांचे चांगले बूच असलेल्या बाटल्यांमध्यें घालून अंधेरांत ठेवावे.† कागदाचे तुकडे जे परीक्षेला घ्यावयाचे, त्यांची लांबीरुंदी सुमारें $\frac{6}{10}$ इंच+$\frac{4}{10}$ इंच असावी.

ब. **नमुन्याचा रंगी कागद**—कारामेल ‡ पाण्यांत वितळवून, तें मिश्रण इतकें दाट करावें कीं तें शंभरपट पातळ केलें असतां (१० घन सेंटिमीटरांचें १ लीटर केलें असतां) त्या पातळ केलेल्या मिश्रणाचा रंग, ०.०००७९ ग्राम आमोनिया किंवा ०.०००२३९०९ ग्राम नवसागर ज्यांत आहे अशा १०० घन सेंटिमीटर पाण्यांत नेस्लरच्या परीक्षेनें उत्पन्न झालेल्या रंगाच्या बरोबर होईल. या कारामेलच्या मिश्रणाच्या रेघा स्वच्छ कुईल-पेनानें पांढऱ्या गाळण्याच्या कागदाच्या § चिरोट्यांवर काढाव्या. या रेघा वाळल्या ह्मणजे, वर सांगितलेल्या परीक्षेच्या कागदाच्या तुकड्यांएवढेच त्या कागदाचे कापून तुकडे करावे; व ते असे करावे कीं प्रत्येक तुकड्यावर लांबीकडून त्याच्या मध्यभागाजवळ एक आडवी उदी रंगाची रेघ यावी; आणि $\frac{1}{2}$ मिलीमीटर पासून १ मिलिमीटरपर्यंत ($\frac{1}{50}$ इंच पासून $\frac{1}{25}$ इंचपर्यंत) जाडीची ज्यांवर उदी रेघ असेल तेवढ्या मात्र चिरोट्या ठेवाव्या.

---

* ह्यांची जरूर असतेच असें नाहीं; कारण त्या पात्रांतल्या पाण्याचें उष्णतामान त्याखालीं लाविलेल्या ज्योतीकडे योग्य लक्ष दिलें असतां सारखें ठेवतां येतें.

† कागद अगदीं नवीन तयार केलेला असून चांगल्या स्थितींत असतो तेथपर्यंत, जालमिश्रित असीटिक आसिडाचा थेंब त्यावर कांचेच्या सळीनें टाकिला असतां रंग मुळींच उत्पन्न होत नाहीं. परंतु कागद तयार केल्याला जास्त दिवस लोटले ह्मणजे, त्या कागदावर पडलेला उजेड ज्या मानानें जास्त प्रखर असेल, त्या मानानें त्या आसिडाच्या थेंबानें त्या कागदांत उदी किंवा निळसर रंग जास्त लवकर उत्पन्न होतो (तो कागद प्रत्यक्ष उन्हांत केवळ एक तास ठेविला तरी त्यापासून त्यावर विशेष परिणाम होतो) आणि असें असेल त्या प्रत्येक प्रसंगीं त्या कागदाचा परीक्षेच्या कामीं उपयोग करूं नये. ह्मणून, हे परीक्षेचे कागद एकाचवेळीं पुष्कळ तयार करणें बरें नाहीं; ते दर महिन्यास किंवा त्या सुमारास नवीन तयार करावे.

‡ साखर जाळून केलेला एका प्रकारचा पदार्थ.

§ हा कागद, रंगनाशक पदार्थ त्यांत मुळींच राहूं न देण्यासाठीं पहिल्याप्रथम, शुद्ध पाण्यानें जपून धुऊन वाळविला पाहिजे.


## १. डायनमैट, सुरुंगाचें जिलेटैन, आणि नैट्रो कंपौंडच्या वर्गाच्या पहिल्या भागांतील इतर बाकी पदार्थ यांची परीक्षा करण्याबाबद.

### अ.—डायनमैट वगैरे.

नैट्रोग्लिसरीनपासून तयार केलेल्या ज्या पदार्थांपासून खालीं लिहिलेल्या रीतीनें नैट्रोग्लिसरीन काढतां येतें, ते पदार्थ खालील परीक्षेस उतरले पाहिजेत ; नाहींतर, लैसेन्सांतील शर्तींअन्वयें " अगदीं शुद्ध केलेल्या नैट्रोग्लिसरीन" पासून ते तयार केलेले आहेत असें समजलें जाणार नाहीं. *

### परीक्षेला लागणारी यंत्रसामग्री.

दोन इंच व्यासाचें एक नरसाळें ( ड ) ; ज्यावर ग्रेन दाखविलेले आहेत असें एक नळीचें माप ( इ ) ( चित्र पहा. )




### कृती करण्याची रीत.

सुमारें ३०० किंवा ४०० ग्रेन डायनमैट ( ब ) चांगला बारीक करून त्या नरसाळ्यांत घालावा; मात्र, त्या नरसाळ्याच्या अकुंचित भागांत नुकताच भाजलेल्या थोड्याशा आसबेस्टासची एक ढिली गुडदी पहिल्यानें बसविलेली (अ) असावी.

त्या डायनमैटचा पृष्ठभाग एकाद्या चपट्या माथ्याच्या कांचेच्या गजानें किंवा स्टापरनें सारखा करावा, आणि त्यावर, साफ धुवून वाळविलेला थोडासा किसेलघर (क) सुमारें एक अष्टमांश इंच जाडीचा थर होईल इतका, पसरावा.

नंतर एकाद्या वॉश बॉटलनें त्या किसेलघरवर पाणी थेंबाथेंबानें जपून सोडावें, आणि पहिल्यानें घातलेलें पाणी मुरलें, ह्मणजे आणखी पाणी घालावें. आणि, खालील मापांत ( इ ) पुरेसें नैट्रोग्लिसरीन जमें तोंपर्यंत असें वरचेवर करावें.

नैट्रोग्लिसरीनबरोबर जर कांहीं पाणी गळालें असलें तर, तें टीप कागदानें टिपून काढावें, आणि जरूर असल्यास, तें नैट्रोग्लिसरीन कोरड्या कागदाच्या गाळणीनें गाळावें.

### परीक्षा करणें.

उष्णतामापक यंत्र, पृष्ठ २८ यावर, नंबर १ याखालीं, पाणी तापविण्याच्या भांड्यांचें वर्णन केलें आहे, त्याच्या झांकणांत, त्या भांड्यांतल्या पाण्यांत २⅜ इंच खोल बुडे अशा रीतीनें बसवावें. ( या पाण्याचें उष्णतामान एकसारखें फा. १६०° राखलें पाहिजे. ) परीक्षा करावयाच्या नैट्रो-ग्लिसरीनपैकीं ५० ग्रेन तोलून तें एका परी-

* नैट्रोग्लिसरीन शुद्ध आहे किंवा नाहीं हें पाहण्यापुरती ही परीक्षा जरी हल्लीं अत्यंत महत्वाची अशी समजतात, तरी, ती, इंग्लंडांत, नैट्रोग्लिसरीनचा कोणताही दिलेला नमुना लैसेन्सांतील शर्तींबरहुकूम आहे असें सिद्ध करण्यास तो ज्या अनेक परीक्षांस उतरावा लागतो, त्यांपैकीं केवळ एकच आहे.

क्षेच्या नळींत घालावें, व तें अशा रीतीनें कीं तें नळीच्या बाजूंस लागून त्या खराब होऊं नयेत. वर सांगितलेल्या कांचेच्या सळईच्या आंकड्यावर एक परीक्षेचा कागद बसवावा, तो असा कीं तो सदहूं नळींत सारला ह्मणजे सरळ उभा रहावा. मग, भट्टीनें शुद्ध केलेलें पाणी अर्धे व ग्लिसरीन अर्धे असें मिसळून केलेलें मिश्रण, त्या परीक्षेच्या कागदापैकीं वरचा अर्धा कागद भिजण्यास पुरे इतकें त्या कागदाच्या वरच्या कडेस उंटाच्या केसांच्या कुंचलीनें लावावें आणि परीक्षेचा कागद लावलेली कांचेची सळई ज्या बुचांत असेल तो बूच परीक्षेच्या नळीला बसवावा, व परीक्षेच्या कागदाची खालची कड सुमारें अर्ध्या नळीपर्यंत आंत जाई अशा रीतीनें तो कागद ठेवावा. ही नळी मग सदरील झांकणांतील छिद्रांपैकीं एकांतून इतकीच आंत घालावी कीं परीक्षेच्या कागदाच्या भिजविलेल्या भागाची खालची कड झांकणाच्या वर सुमारें $\frac{2}{5}$ इंच राही अशी असावी. नंतर, कागदाचा कोरडा भाग व ओला भाग यांच्या दरमियानच्या हद्दीच्या रेषेकडे कांहीं वेळानें जी फिकी उदी रंगाची रेषा उठते तिचा रंग नमुन्याच्या रंगी कागदावरील उदी रेषेच्या रंगाबरोबर झाला ह्मणजे परीक्षा पुरी झाली असें समजावें.

वर सांगितल्याप्रमाणें नमुन्याबरहुकुम रंग उत्पन्न होण्याला लागणारा वेळ जेव्हां १९ मिनिटांहून कमी नसेल तेव्हां परीक्षा केलेलें नैट्रो-ग्लिसरीन लैसेन्सच्या अटींप्रमाणें ' अगदीं शुद्ध केलेलें आहे' असें समजावें.

### ब.—सुरुंगाचें जिलेटैन व जिलेटैनपासून केलेला डायनमैट आणि त्यांसारखे इतर पदार्थ.

पन्नास ग्रेन सुरुंगाचें जिलेटैन शंभर ग्रेन फ्रेंच चाकमध्यें अगदीं एकत्र मिसळून * तें मिश्रण डायनमैटकरितां सांगितलेल्या उष्णतेच्या परीक्षेंत दिलेल्या परिमाणाच्या एका परीक्षेच्या नळींत थोडेंथोडें भरावें; आणि जसजसें तें थोडथोडें नळींत घालण्यांत येईल तसतशी मधून मधून ती नळी टेबलावर हळू हळू ठोकावी; असें करण्याचें कारण हें कीं, जेव्हां तें सगळें मिश्रण नळींत घातलें जाईल तेव्हां ती $1\frac{3}{4}$ इंच (एक पूर्णांक तीन चतुर्थांश इंच) उंचीपर्यंत मात्र भरावी. मग परीक्षेचा कागद त्या नळींत घालावा, व डायनमैटच्या उष्णतेच्या परीक्षेकरितां सांगितलेल्या रीतीनें उष्णता लावावी. परीक्षा करावयाचा मासला फा. १६०° उष्णतामानाला ठेवलेला असतां परीक्षेच्या कागदामध्यें डायनमैट करितां सांगितलेल्या उष्णतेच्या परीक्षेच्या निर्णयासाठीं जो नमुन्याच्या रंगाचा कागद घेतलेला असतो त्याच्या रंगाशीं मिळता असा रंग उत्पन्न होण्याला दहा मिनिटांचा अवकाश लागला पाहिजे.

(सुरुंगाचें जिलटैन वगैरे बाबदची पाझरण्यासंबंधाची व द्रवण्यासंबंधाची परीक्षा पाहणें असल्यास पृष्ठ २१ वरील पुरवणी पाहा.)

टीप —नैट्रोग्लिसरीनच्या, जिलाटिनशीं संयुक्त न झालेल्या ज्या पदार्थांतून नैट्रोग्लिसरीन हें पाण्याच्या योगानें बाहेर काढितां येत नाहीं, त्या पदार्थांची परीक्षा, त्यांचे घटकावयव निराळे काढल्याशिवाय, करावी परीक्षेच्यावेळीं त्यांचें उष्णतामान वर सांगितल्याप्रमाणें (१६०° फारनहैट) असावें, आणि वेळ सात (७) मिनिटें असावा.

### क. कॉर्डाइट व बालिस्टाइट.

#### १. परीक्षेला लागणारी यंत्रसामग्री.

कार्डाइटला उष्णतेची परीक्षा लावण्याकरितां घ्यावयाची यंत्रसामग्री, सदरीं (पृष्ठ २७ पहा) साधारणपणें † नैट्रोग्लिसरीनच्या वर्गांतील बारीपदार्थांच्या परीक्षेकरितां जी यंत्रसामग्री वर्णिलेली आहे, तीच घ्यावी; मात्र, वॅल्थाम आबी येथें कार्डाइट हें परीक्षेसाठीं तयार करण्याकरितां उपयोग करितात तसें एक मिल (जातें) व चाळण्यांचा एक संच ही सामग्री आणखी असावी. (खालीं दिलेल्या समजुती पहा.)

#### २. परीक्षेकरितां मासला तयार करणें.

परीक्षेकरितां निवडलेल्या दरेक कांडीच्या एका शेवटाकडील अर्धा इंच लांबीचा एक एक तुकडा कापून घ्यावा; जास्त जाडीच्या कार्डाइटच्या बाबतींत, ह्याप्रमाणें घेतलेल्या दरेक तुकड्याचे आणखी सुमारें चार तुकडे करावे. ह्याप्रमाणें

* हें, ते दोन्ही पदार्थ एकाद्या लांकडी खलामध्यें घालून लांकडाच्या बत्त्यानें जपून खलले तर, सहज होण्यासारखें आहे.

हा फ्रेंचचाक चांगल्या बाजारी तऱ्हेचा असावा, आणि तो, भट्टीनें शुद्ध केलेल्या पाण्यानें जपून धुऊन, वॉटर ओव्हेनमध्यें वाळविल्यावर, दमट हवेंत शेंकडा अर्धा भाग ओलावा शोषून घेई तोंपर्यंत, एकाद्या कांचेच्या हांडीखालीं उघडा ठेवावा. मग तो बाटलींत भरून ठेवावा, साधारण काळजी घेतली तर शेंकडा अर्धा भाग पाण्याची सदहूं मर्यादा सहज राखता येण्यासारखी आहे.

† वाल्थाम आबे येथील यंत्रांतल्या झांकणांतलीं (आकृति २) छिद्रें, एक मध्यभागीं व तीन परिघा भोंवतीं नसून, सगळीं परिघा भोंवतीं असतात.

काढून घेतलेले तुकडे, नंतर, सदहूं जात्यांतून दोन तीन वेळां काढावे ; आणि त्या जात्याचा कांहीं अंश त्यांतून पहिल्यानें बाहेर पडणाऱ्या पदार्थांत असण्याचा संभव असतो ह्मणून तो पहिल्यानें बाहेर पडणारा पदार्थ परीक्षेस घेऊं नये. ह्याप्रमाणें दळून बारीक केलेला तो पदार्थ, चाळण्यांच्या संचापैकीं सगळ्यांत वरील चाळणींत घालून चाळावा. त्या वरच्या चाळणींतून गळून त्याच्या खालच्या चाळणींतून न गेलेला असा पदार्थ परीक्षेसाठीं घ्यावयाचा. दरेक नमुना दळल्यावर, त्या जात्याचे भाग निरनिराळे करून तें काळजीपूर्वक साफ करावें.

### ३. परीक्षा करणें.

उष्णतामापक यंत्र, २७ व्या पृष्ठावर नंबर १ ह्या खालीं वर्णिलेल्या पात्रांतील पाण्यांत २$\frac{3}{4}$ इंच खोल बुडे अशा रीतीनें तें त्या पात्राच्या झांकणांत बसवावें. या पाण्याचें उष्णतामान एकसारखें फा १८०° राखलें पाहिजे. उष्णतामान इतकें झालें ह्मणजे, चाळलेल्या कार्डाइटपैकीं २९ ग्रेन कार्डाइट परीक्षेच्या नळींत घालून तें हळू हळू ठोकून, तळाशीं जमवावें. नंतर काचेच्या सळईच्या खालच्या शेवटाला एक परीक्षेचा कागद अशा रीतीनें लावावा कीं तो परीक्षेच्या नळींत लोंटला ह्मणजे उभा रहावा. मग ज्यांत शुद्ध ग्लिसरिन (प्राइसचें) आणि भट्टीनें शुद्ध केलेलें पाणी हीं बरोबरीनें मिसळलीं आहेत अशा मिश्रणाचा एक थेंब उंटाच्या केसांच्या कुंचलीनें परीक्षेच्या कागदाच्या वरल्या कडेला लावावें ; हें पाणी त्या कागदाचा वरचा अर्धा भाग भिजण्याला पुरे इतकें असावें; मग परीक्षेच्या कागदाची खालची कड सुमारें अर्ध्या नळीपर्यंत आंत जाई अशा रीतीनें तो कागद बसवावा. आणि मग ती नळी, त्या झांकणाच्या एका छिद्रांतून, उष्णतामापक यंत्राइतकीच खालपर्यंत घालावी. त्या कागदाच्या भिजविलेल्या भागाची खालची कड झांकणाच्या पृष्ठभागाच्या वर सुमारें पांच अष्टमांश इंचां इतकी यावी. मग, परीक्षेच्या कागदाचा कोरडा भाग व ओला भाग यांच्या दरमियानच्या हद्दीच्या रेषेकडे जी फिकी उदी रंगाची रेषा दिसते, तिचा रंग, नमुन्याच्या रंगी कागदावरील उदी रेषेच्या रंगाबरोबर झाला ह्मणजे परीक्षा पुरी झाली असें समजावें.

परीक्षेची नळी आंत घातल्यापासून परीक्षा पुरी होण्यास लागणारा वेळ १९ मिनिटांहून कमी असूं नये.

टीप.—बालिस्टाइटच्या बाबतींतही सदहूप्रमाणेंच क्रिया करावी लागते; मात्र इतकेंच कीं तें चांगलें दाणेदार असल्यास तें फोडावें लागणार नाहीं.

### २. गनकॉटन, शूटिंग गन पौडर, इ-सी-पौडर आणि नैट्रो कांपौंड वर्गाच्या २ऱ्या भागांतील इतर बारी पदार्थांची परीक्षा करणें.

### अ. गनकॉटन, टोनाइट, इत्यादि.

काडतुसाचा मध्यभाग हळू हळू खरवडून त्यांतला, दोन अगर आधिक परीक्षांस पुरण्याइतका पदार्थ, बाहेर काढावा, आणि जरूर असल्यास, तो, बोटांमध्यें चिरडून आणखी बारीक करावा.

ह्याप्रमाणें तयार केलेली बारीक भुकटी, ६ इंच ×४$\frac{1}{2}$ इंच अशा कागदाच्या बशींत पसरून तिचा तेथें एक पातळ थर करावा, आणि मग ती बशी, वॉटर ओव्हेनमध्यें ठेऊन, ती ओव्हेन साध्य असेल त्या मानानें, १२०° फारनहैट उष्णतामानावर ठेवावी.

त्या ओव्हेनमधले तारेच्या जाळीचे पडदे एकमेकांपासून सुमारें ३ इंच अंतरावर असावे, सदहूं नमुना त्या ओव्हेनमध्यें १९ मिनिटेंपर्यंत न हालवितां राहूं द्यावा; आणि तिचा दरवाजा अगदीं उघडा ठेवावा.

१९ मिनिटांनंतर सदहूं बशी त्या ओव्हेनमधून काढून तिला त्या खोलींतली हवा सुमारें दोन तासपर्यंत लागूं द्यावी, आणि ह्या वेळांत, तो नमुना हातानें त्या बशींत चिरगडून त्याची बारीक आणि सारखी अशी भुकटी करावी.

### परीक्षा करणें.

सदरीं वर्णन केलेल्या पाणी तापविण्यांच्या भांड्यांच्या झांकणांत बसवावयाचा एक ग्यास रेग्युलेटर असतो; हा, मधल्या (नंबर ४ च्या) भोंकांत बसवीत असतात. उष्णतामापक यंत्र, नंबर ३ च्या भोंकांत बसवावें. मग, त्या भाड्यांतलें पाणी १७०° फारनहैट उष्णतामानापर्यंत तापवून, तेंच उष्णतामान राखण्याकरितां सदहूं ग्यास रेग्युलेटर त्याच्या जागीं बसवावा. मग, परीक्षा करावयाचा नमुना २० ग्रेन तोलून घ्यावा आणि तो परीक्षेच्या नळींत घालून हळू हळू असा चेपून बसवावा कीं, तो सदरीं निर्दिष्ट केलेल्या व्यासाच्या परीक्षेच्या नळींत सरासरीनें

१⅙ इंच जागा व्यापील. मग, कांचेच्या सळीच्या अगर नळीच्या शेवटीं असलेल्या आंकड्यास एक परीक्षाकागद लावून, त्याच्या वरच्या कडेवर, ज्यांत शेंकडा ५० भाग प्राइसचें ग्लिसरीन आहे असा, भट्टीनें शुद्ध केलेल्या पाण्याचा एक थेंब टाकून तो कागद ओला करावा हें पाणी, त्या कागदाचा सुमारें अर्धा भाग मात्र ओला होईल इतकें असावें. मग, ज्या बुचांत ती सळी व तो परीक्षेचा कागद बसविलेला असेल, तें बूच परीक्षानळींत बसवून ती नळी, त्या पाण्याच्या भांड्यांत, कव्हरापासून सुमारें २½ इंच खालीं पोंचेल अशा बसवावी, आणि रेग्युलेटर व उष्णतामापक यंत्र हीं देखील तितकींच खालपर्यंत बसवावीं. तो परीक्षेचा कागद त्या परीक्षानळीच्या वरच्या बाजूस, परंतु त्या बुचास लागूं न देतां, ती नळी आंत घालून सुमारें पांच मिनिटें होत तोंपर्यंत, राखला पाहिजे. ह्यावेळेच्या सुमारास, त्या परीक्षा नळीच्या बाजूवर, त्या पाण्याच्या भांड्याच्या झांकणाच्या वरच्या बाजूस, थोड्याशा अंतरावर, एक ओलाव्याचें कडें दिसूं लागेल; मग ती कांचेची नळी खालीं सरकवावी, ती इतकी कीं, त्या कागदाच्या ओला केलेल्या भागाची खालची कड त्या नळींत जें ओलाव्याचें कडें पडलेलें असेल त्याच्या खालच्या कडेच्या पातळींत यावी; मग त्या कागदाकडे बारकाईनें पाहात असावें; आणि कागदाचा कोरडा भाग व ओला भाग ह्यांच्या दरमियानच्या हद्दीच्या रेघेकडे फिका उदी रंग दिसूं लागला ह्मणजे परीक्षा पुरी झाली असें समजावें.

गनकॉटन भरलेली परीक्षानळी १७०° उष्णतामानाच्या पाण्यांत घातल्यापासून सदर्हूप्रमाणें उदी रंग पाहिल्यानें दिसूं लागे तोंपर्यंत लागणारा वेळ हीच त्या पदार्थाची परीक्षा होय. आणि हा वेळ १० मिनिटांहून कमी असूं नये; वेळ कमी लागला तर, योग्य रीतीनें शुद्ध केलेला नाहीं ह्मणून तो नमुना पसंत केला जाणार नाहीं.

### ब. जिलाटिनयुक्त अशे गन-काटनपासून केलेले पदार्थ.*

डायनमैटकरितां सांगितलेल्या उष्णतेच्या परीक्षेसाठीं ज्या लांबी रुंदीची परीक्षानळी * सांगितली आहे, तींत, सदर्हू पदार्थ २९ ग्रेन घालून, सुरुंगाच्या जिलटैनच्या बाबतींत क्रिया करितात तशी क्रिया करावी; मात्र, उष्णतामान घ्यावयाचें तें १८०° फ़ारनहीट घ्यावें, आणि वेळ १५ मिनिटें समजावा.

### क. शूलटझ पौडर, इ. सी. पौडर, कलोडियन कॉटन वगैरे.

नमुन्यापैकीं पुरेसा भाग, त्याचा आणखी चुरा न करितां, सदर्हूप्रमाणें ओव्हेनमध्यें ठेवून सुकवावा, आणि मग दोन तासपर्यंत हवेंत उघडा ठेवावा; मग, दाबिलेल्या गनकॉटन वगैरेंकरितां जी परीक्षा वर सांगितली आहे, तीच परीक्षा त्या पदार्थास लावावी; ह्या परीक्षेचा कमींत कमी वेळही तितकाच ह्मणजे १० मिनिटें आहे.

### ड.—पिक्रिक आसिड.

(१) ह्या पदार्थाचे शंभर भाग घेऊन ते १६०° फारनहैट उष्णतामानावर सुकविले असतां त्यांत खनिज किंवा न जळणारा असा पदार्थ ०.३ हून जास्त असूं नये.

(२) सुकविलेल्या शंभर भागांत (संयुक्त झालेलें व संयुक्त नं झालेलें असें) सल्फ़ूरिक आसिड एकंदरींत ०.३ भागाहून जास्त नसावें, आणि त्यांत, संयुक्त न झालेलें असें सल्फ़ूरिक आसिड ०.१ भागाहून जास्त नसावें.

(३) असा २० ग्रेन पदार्थ, डायनमैटकरितां जी उष्णतेची परीक्षा सांगितली आहे (मागील पृष्ठ २९ पाहा) त्या परीक्षेस, निदान १९ मिनिटेंपर्यंत उतरला पाहिजे.

### इ. आमोनाइट, बेल्लाइट, रॉब्युराइट, व त्याच प्रकारच्या घटनेचे बाकी पदार्थ.

हे, गन कॉटन ह्याकरितां जी उष्णतेची परीक्षा सांगितली आहे (वरचा मजकुर पाहा) त्याच परीक्षेस उतरले पाहिजेत.

### ३.—क्लोरेटच्या मिश्रणांची परीक्षा करणें.

ह्या वर्गांतले सरकारानें कबूल केलेले असे बारी पदार्थ मुळींच नसल्या कारणानें, ह्यांच्या परीक्षेबद्दलचे नियम अद्याप ठरविलेले नाहींत; परंतु तसे कोणतेही पदार्थ कबूल करण्यांत आल्यास, गनकॉटनकरितां जी उष्णतेची परीक्षा ठरविली आहे, त्या परीक्षेस ते उतरले पाहिजेत असें ठरविणें जरूर पडेल. आणि धक्का व घर्षण (विशेषेंकरून तिरकस ठोका) ह्यांच्या योगानें त्यांच्या ठायीं स्फोट कितपत उत्पन्न होतो तें वरचेवर पाहिलें पाहिजे.

* दाबून बनविलेले असल्यास, कॉर्डाइट व बालिस्टाइट प्रमाणेंच त्याचा चुरा करावा.

## पुरवणी.

### सुरुंगाचें जिलेटैन व जिलेटैनपासून केलेला डायनमैट व त्यांसारखे पदार्थ हीं कशीं काय पाझरतात व द्रवतात हें पाहण्याकरितां परीक्षा.

### द्रवण्याबद्दलची परीक्षा.

सुरुंगाच्या जिलेटैनचा एक वर्तुलस्तंभ ( सिलिंडर ) परीक्षा करावयाच्या काडतुसांतून कापून घ्यावा. या वर्तुलस्तंभाची लांबी सुमारें त्याच्या व्यासाइतकी असून, त्याचीं टोकें सपाट कापलेलीं असावीं.

हा वर्तुलस्तंभ कांहीं आच्छादन नसलेल्या अशा एकाद्या सपाटीवर उभा ठेवून त्याच्या मधून एक टांचणी उभी रोंवून तो मजबूत बसवावा.

या स्थितीमध्यें सदई वर्तुलस्तंभ फारनहैट ८५° ते ९०° ( हे दोन्ही अंश धरून) याच्या दरमियान असणाऱ्या उष्णतामानाला लागोपाठ एकशें चव्वेचाळीस तास ( सहा दिवस व सहा रात्री ) ठेवावा, आणि याप्रमाणें ठेवलेल्या वेळांत त्या वर्तुलस्तंभाची लांबी एक चतुर्थांशावर कमी होतां कामा नये व वरल्या सपाट कापलेल्या टोंकाचा सपाटपणा व त्याच्या कडेची कोर हीं जशाचीं तशींच राहिलीं पाहिजेत.

टीप.—परीक्षा करावयाचें सुरुंगाचें जिलेटैन व जिलेटैनपासून केलेला डायनमैट हीं वर्तुलस्तंभाच्या आकाराचीं केलेलीं नसलीं, तर सदरील परीक्षा, जरूर असतील तशा फेरफारांनीं, लागू केली पाहिजे.

### सदई पदार्थ पाझरण्याजोगे आहेत किंवा कसें हें पाहाण्याकरितां परीक्षा.

सुरुंगाचें जिलटैन किंवा जिलटैनपासून केलेला डिनमैट हीं कोणत्याही प्रकारें सांठवून ठेवण्यांत, एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्यांत अगर उपयोग करण्यांत येत असतां, अथवा प्रथम थिजवून पुनः द्रवविणें या क्रमानें तीं लागोपाठ तीन वेळां थिजविलीं व तीन वेळां द्रवविलीं असतां, किंवा पूर्वीं सांगितलेली द्रवण्याबाबदची परीक्षा लागू करण्यांत आली असतां, त्या एकंदर सुरुंगाच्या जिलटैनहून किंवा जिलटैनपासून केलेल्या डिनमैटहून कमी दाट असणारा असा कोणताही पदार्थ त्यापासून निराळा निघतां कामास नये.

( सही ) जे. पी. ह्यूएट,<br>
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार."

आलीजाह गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,<br>
( सही ) जे. मॉनटीथ,<br>
आक्टिंग चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)<br>
M. A. BAIG,<br>
Oriental Translator to Government.

# रेव्हेन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम बंजिरे मुंबई, तारीख १६ माहे डिसेंबर सन १८९६.

नंबर १०३१३.—हिंदुस्थान सरकारच्या खालील जाहीरनामा पुनः प्रसिद्ध केला असेः—

## " फिनान्स ॲण्ड कामर्स डिपार्टमेंट.

## सेपरेट रेव्हेन्यू.

### स्टांप.

### नान जुडिशियल स्टांप.

माफी वगैरे.

मुक्काम कलकत्ता, तारीख ११ माहे डिसेंबर सन १८९६.

नंबर ५२४९—एस्. आर.—ज्याअर्थी, मुंबई बंदराच्या ट्रस्टींस १०,२५,०००, रुपयांची जी रकम कर्जी काढण्याचा अधिकार दिला होता, ती रकम २० आक्टोबर १८९६ तारखेचे खालील डिबेंचर ह्मणजे—

| | प्रत्येकीं किंमत रुपये. | रकम रुपये. |
|---|---|---|
| नंबर. २२७-८, २३५, २६६-३०५, ४४८-६३, ४८४-५२३, ५४० आणि ५४२-११७९ ... ... ... | ५०० = | ३,६९,००० |
| ,, ०२१-०२३, ०२९-०४६, ०५२-२२३, २२५-६, २३१-४ २३६-६५, ३०६-४४७, ४६४-८३, ५२४-३९ आणि ५४१ | १,००० = | ४,०८,००० |
| ,, २२९-३० ... ... ... ... ... | २,००० = | ४,००० |
| ,, २२४ ... ... ... ... ... ... ... ... | | ४,००० |
| ,, ००३-०२०, ०२४-०२८, ०४७-०५१ .. ... | ५,००० = | १,४०,००० |
| ,, ००१-००२ ... ... ... ... ... | ५०,००० = | १,००,००० |
| | एकूण | १०,२५,००० |

हे डिबेंचर काढून कर्जी काढावयाची आहे, त्या रकमेवर पडणाऱ्या स्टांप ड्यूटीबद्दल, फिनान्स ॲण्ड कामर्स डिपार्टमेंटांतील ठराव नंबर ३६४६, * तारीख १३ माहे नोव्हेंबर सन १८८० ह्यांतील शर्तींअन्वयें ५१२५ रुपयांची उक्ती रकम सदर्हू ट्रस्टींनीं सरकारच्या तिजोरींत भरली आहे, त्याअर्थीं हिंदुस्थानचा स्टांप आक्ट ह्याच्या ८ व्या कलमावरून दिलेला अधिकार चालवून गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांनीं, सदर्हू डिबेंचरांवर एऱ्हवीं जी कोणतीही स्टांपड्यूटी पडती, मग ती ते काढते वेळीं असो, नवीन करते वेळीं असो, एका ऐवजीं अनेक करते वेळीं असो, अगर अनेकां ऐवजीं एक आंखा करते वेळीं असो, ती त्या डिबेंचरांस माफ केली आहे.

* तारीख १८ माहे नोव्हेंबर सन १८८० चें मुंबई सरकारी गॅझेट, भाग १, पृष्ठ ९४५, ह्यावर पुनः प्रसिद्ध केलेला.

( सही ) जे. एफ्. फिन्ले,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार."

आलीजाह गव्हर्नर साहेब बहादूर इन् कौन्सिल ह्यांच्या हुकुमावरून,

(सही) जे. मांटीथ,
आक्टिंग चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.